## नेमणे आहे

नामवंत दै. 'जनता आवाज' वृत्तपत्रासाठी प्रतिनिधी नेमणे आहेत.

१) अहिल्यानगर
२) पुणे
३) नाशिक
४) छत्रपती संभाजीनगर
५) बीड

संपर्क:- ८८९६७११७११

jantaawajnews@gmail.com



दैनिक

# जनता आवाज

अहिल्यानगर | वर्ष ०२ रे | अंक ७७ शनिवार, दि. ०३ मे २०२५ | PRGI No. MHMAR/25/RAA11 | पाने ०८ | किंमत ४ रुपये



साई समर्थ सिमेंट प्रॉडक्टस्

पाईप कंपनी ६ इंच ते ६ फुटापर्यंत सिमेंट पाईप (As Per ISI) योग्य दरात उपलब्ध.



सिमेंट पाईप | सेप्टिक टँक | वॉटर टँक | गव्हाणी,ढापे | सिमेंट पोल

सतिष उत्तमराव खर्डे पा. 9552749534
अमोल सिताराम थोरात पा. 9764626533
ज्ञानेश्वर रघुनाथ खर्डे पा. मा.उपसरपंच,को.बु।।


राजुरी रोड,श्री स्वामी समर्थ केंद्राच्या पुढे,कोल्हार बु।। 9765481334


# विझिंजम बंदर मैलाचा दगड

## पंतप्रधान नरेंद्र मोदी; शशी थरूर मोदींसोबत मंचावर

जनता आवाज वृत्तसेवा

**तिरुवनंतपुरम/अमरावती : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी केरळमधील तिरुअनंतपुरम येथे ८,९०० कोटींच्या विझिंजम आंतरराष्ट्रीय खोल समुद्र-पाणी बहुउद्देशीय बंदराचे उद्घाटन केले. यावेळी, पंतप्रधानांनी केरळचे मुख्यमंत्री पिनाराई विजयन आणि काँग्रेस नेते शशी थरूर यांच्या मंचावर उपस्थितीवरून काँग्रेसवर टीका केली.**





पंतप्रधान म्हणाले, मी मुख्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की तुम्ही एनडि युतीचे एक मजबूत आधारस्तंभ आहात. शशी थरूरही इथे बसले आहेत. आजचा कार्यक्रम अनेकांची झोप उडवून देणार आहे. संदेश जिथे पोहोचायला हवा होता तिथे गेला.

मोदींनी हे बंदर देशाच्या विकासासाठी एक मैलाचा दगड असल्याचे वर्णन केले. ते म्हणाले की, हे बंदर ८,८०० कोटी खर्चून बांधण्यात आले आहे. येत्या काळात, येथे तिप्पट जहाजे ट्रान्स-शिप करता येतील आणि आता मोठी मालवाहतूक करणारी जहाजे देखील थेट भारतात येऊ शकतील.

केरळ कार्यक्रमानंतर, पंतप्रधान आंध्र प्रदेशला रवाना होतील. ते दुपारी ३.३० वाजता अमरावतीला पोहोचतील. येथे ते ५८ हजार कोटी रुपयांच्या अनेक विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटन करतील. याशिवाय, ते अमरावती राजधानीच्या बांधकामाचे पुन्हा उद्घाटन करतील. पंतप्रधान गुरुवारी रात्री केरळला पोहोचले. यादरम्यान, तिरुवनंतपुरम विमानतळावर केरळचे मुख्यमंत्री पिनारायी विजयन, केंद्रीय मंत्री जॉर्ज कुरियन आणि काँग्रेस खासदार शशी थरूर यांनी त्यांचे स्वागत केले.

पंतप्रधान मोदी आंध्र प्रदेशातील अमरावती राजधानीच्या बांधकामाचे पुन्हा उद्घाटन करतील. तिरुपती, श्रीकालहस्ती, मलाकोंडा आणि उदयगिरी किल्ल्यासारख्या धार्मिक आणि पर्यटन स्थळांपर्यंत सहज पोहोचणाऱ्या ७ राष्ट्रीय

पान ४

### सागरी व्यापाराला बळकटी येणार

विझिंजम आंतरराष्ट्रीय खोल समुद्र-पाणी बहुउद्देशीय बंदर हे देशातील पहिले अर्ध-स्वयंचलित ट्रान्स शिपमेंट पोर्ट आहे. भारताचा सागरी व्यापार वाढविण्यासाठी आणि जागतिक स्तरावर तो बळकट करण्यासाठी याची निर्मिती करण्यात आली आहे.

### सागरी व्यापाराला बळकटी येणार

जेव्हा एखादे मोठे जहाज एखाद्या देशातील बंदरात माल आणते, परंतु तो माल दुसऱ्या देशात किंवा शहरात पोहोचवावा लागतो, तेव्हा तो माल तेथून लहान जहाजांवर किंवा इतर मार्गांनी लोड केला जातो आणि पुढे पाठवला जातो. या प्रक्रियेला ट्रान्स-शिपमेंट म्हणतात.

# माजी आ. अरुणकाका जगताप काळाच्या पडद्याआड

**जनता आवाज वृत्तसेवा**



**अहिल्यानगर :** पुणे येथील खासगी रुग्णालयात उपचार घेत असलेले माजी आ. अरुणकाका बलभिमराव जगताप यांचे काल पहाटे वयाच्या ६७ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्यावर गेल्या महिन्यापासून उपचार सुरू होते. ते आ. संग्राम जगताप यांचे वडील होते.

अहिल्यानगर शहर आणि जिल्ह्याच्या राजकारणात जगताप यांचा मोठा प्रभाव होता. ते अहिल्यानगर नगरपालिकेचे माजी अध्यक्ष होते. त्यांनी दोनदा विधान परिषदेवर प्रतिनिधित्व केले. जिल्हा बँकेचे संचालक म्हणूनही त्यांनी काम पाहिले.

आ. शिवाजी कर्डिले आणि भानुदास कोतकर यांचे ते व्याही होते. अरुण जगताप हे नगरच्या राजकारण आणि समाजकारणात काका नावाने परिचित होते. त्यांच्या पश्चात पत्नी पार्वती, मुले आमदार संग्राम जगताप, माजी जिल्हा परिषद सदस्य सचिन, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

अरुण जगताप यांची राजकीय कारकीर्द ही काँग्रेसमधून सुरू झाली. युवक काँग्रेसचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले होते. अहमदनगर पालिकेचे नगराध्यक्षपदही त्यांनी भूषविले आहे. जिल्हा क्रिकेट संघटनेचे ते अध्यक्ष होते. तसेच गुणे आयुर्वेद शैक्षणिक संस्थेचे ते अध्यक्ष होते. अरुण जगताप हे राष्ट्रवादी काँग्रेसकडून सलग दोन वेळा स्थानिक स्वराज्य संस्थेतून विधानपरिषदेवर निवडून गेले होते.

## संमिश्र

### आमदार जितेंद्र आव्हाडांना धमकी!

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई :** शरद पवार गटाचे नेते आणि आमदार जितेंद्र आव्हाड यांना एका अज्ञात व्यक्तिकडून जीवे मारण्याची धमकी मिळाली आहे. याबाबत आव्हाड यांनी ट्विटर एक्सवर माहिती दिली आहे. तसेच धमकी देणाऱ्याचा मोबाइल क्रमांक पोस्ट करुन पोलिसांनी दखल घ्यावी, असेही त्यांनी म्हटले आहे.

### ... तोपर्यंत चप्पल घालणार नाही

**जनता आवाज वृत्तसेवा**

**बीड :** मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांना न्याय मिळेपर्यंत पायात चप्पल न घालण्याचा निर्धार त्यांच्या बहिणीने केला आहे. सरकार आम्हाला न्याय केव्हा मिळवून देईल हे माहिती नाही. त्यामुळे मी आत्ता विठ्ठलालाच न्याय देण्याचे साकडे घातले आहे, असे त्या म्हणाल्यात.

### दोन तरुणावर प्राणघातक हल्ला

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नाशिक :** राज्यात गुन्हेगारीचे प्रमाण वाढताना दिसून येत आहे. नाशिकमध्ये काल रात्री जेलरोड परिसरात दोघांवर प्राणघातक हल्ला करण्यात आला. यात एका तरुणाचा जागीच मृत्यू झाला असून दुसरा तरुण गंभीर जखमी झाला आहे. रितेश डोईफोडे असे हत्या झालेल्या तरुणाचे नाव आहे. दरम्यान प्राथमिक माहितीनुसारही हत्या पूर्ववैमनस्यातून झाल्याची माहिती आहे. घटनेनंतर हल्लेखोर स्वतःहून नाशिकरोड पोलिसांना शरण आल्याची माहिती मिळत आहे.

# देश दुष्काळमुक्त होण्यासाठी शासन कटिबद्ध

## केंद्रीयमंत्री सी. आर. पाटील; गावातील पाणी गावातच आडवा



**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिर्डी :** पुढील चार वर्षांत देशातील कोणतेही गाव, शेत पाण्यापासून वंचित राहू नये व देश दुष्काळमुक्त व्हावा, असा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा संकल्प असून यासाठी केंद्र शासन कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांनी केले.

शासन तर आपले काम करणारच आहे, मात्र एक जबाबदार नागरिक म्हणून प्रत्येकाने पाण्याचा काटकसरीने वापर केला पाहिजे, गावातील पाणी गावातच अडवून साठवावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

राहाता तालुक्यातील अस्तगाव येथे महाराष्ट्र सिंचन सुधारणा कार्यक्रम टप्पा १ अंतर्गत गोदावरी उजवा तट कालव्यावरील मातीकाम, बांधकाम व अस्तरीकरण कामाचे भूमिपूजन केंद्रीय मंत्री सी. आर. पाटील यांच्या हस्ते झाले. त्याप्रसंगी ते बोलत होते.

केंद्रीय जलशक्ती मंत्री पाटील म्हणाले की, संपूर्ण जगाच्या १८ टक्के लोकसंख्या आणि १८ टक्के पशुधन भारतात आहे.

पान ४

### दिग्गज मान्यवरांची हजेरी

राज्याचे जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, राज्यसभा सदस्य धनंजय महाडिक, आ. आशुतोष काळे, जलसंपदा विभागाचे अप्पर मुख्य सचिव दिपक कपूर, माजी मंत्री तथा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक आण्णासाहेब म्हस्के पाटील, माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील आदी दिग्गज मान्यवर उपस्थित होते.

# जिवंत बॉम्ब लष्कराकडून निकामी

## खा. निलेश लंकेंच्या सुचनेची दखल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर :** राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठाच्या परिसरात फायटर जेटमधून पडून जमिनीमध्ये सात फुटांवर रूतून बसलेला जिवंत बॉम्ब लष्कराकडून निकामी करण्यात आला. यासंदर्भात खा. निलेश लंके यांनी लष्करी अधिकाऱ्यांच्या बैठकीत हा बॉम्ब निकामी करण्याच्या सुचना दिल्या होत्या. या सुचनांची दखल घेत लष्कराकडून १ मे रोजी हा बॉम्ब निकामी करण्यात आला.



वरवंडी येथे फायटर विमानातून हा बॉम्ब पडून जमीनीमध्ये रूतल्याने शेतकऱ्यांच्या जल वाहिन्या फुटल्या. त्यामुळे शेतांमधील पीके जळण्याची वेळ आली होती. सात दिवस उलटूनही बॉम्ब हटविण्यासंदर्भात काहीही कार्यवाही झाली नव्हती. खा. लंके यांच्या ही बाब लक्षात आणून दिल्यानंतर त्यांनी स्टेशन कमांडर आणि लष्करी अधिकाऱ्यांसमवेत पार पडलेल्या बैठकीत हा बॉम्ब निकामी करण्याचे स्पष्ट निर्देश दिले होते.

या बैठकीत नागरीकांनाही सहभागी करून घेण्यात आले होते. सुरक्षिततेच्या

पान ४

> नागरीकांच्या जीविताला धोका निर्माण होवू नये, म्हणून आम्ही तातडीने कारवाई करण्याच्या निर्देश दिले होते. त्यास लष्करी प्रशासनाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला. सुरक्षिततेच्या दृष्टीने विचार करून लष्कराने केलेल्या कारवाईबद्दल त्यांचे आभार मानतो.
>
> **- निलेश लंके, खासदार**

# जातिनिहाय जनगणना ऐतिहासिक निर्णय : आ. खताळ

**जनता आवाज वृत्तसेवा**



**संगमनेर :** जातनिहाय जनगणना करण्याचा मुद्दा काँग्रेसच्या जाहीरनाम्यात असतानाही, प्रत्यक्ष त्यांचे सरकार सत्तेवर आल्यानंतर त्यांनी त्या मुद्द्याकडे गेल्या ६५ वर्षांत काँग्रेस सरकारने या महत्त्वाच्या मुद्याकडे दुर्लक्ष केले होते. त्यांच्या या अपारदर्शकते मुळे देशातील विविध जातींमध्ये भांडणे आणि संघर्ष निर्माण झाले. मात्र केंद्रातील मोदी सरकारने जातीनिहाय जनगणना करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला त्या निर्णयामुळे समाजातील प्रत्येक घटकाला न्याय मिळणार असल्याचे मत आ. अमोल खताळ यांनी व्यक्त केले. आ. खताळ म्हणाले की, 'काँग्रेसच्या वर्तवणुकीमुळे अनेक

पान ४

> केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारचा हा निर्णय केवळ राजकीय नाही, तर समाज परिवर्तनाच्या दिशेने एक ऐतिहासिक पाऊल आहे. सबका साथ, सबका विकास ही संकल्पना प्रत्यक्षात आणत आहे. हा निर्णय देशाच्या सामाजिक विकासाचा चेहरा बदलणारा ठरणारा आहे.
>
> **- अमोल खताळ, आमदार**

# शांतता भंग करणाऱ्यांवर कारवाई होणार

## राजेश परजणे; कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्नांवर ग्रामसभा



**जनता आवाज वृत्तसेवा**

**संवत्सर :** संवत्सर गावाला पौराणिक, धार्मिक व सांस्कृतिक वारसा लाभलेला असल्याने गावातील विविध जाती धर्माचे लोक एकोप्याने व सलोख्याने नांदत असताना काही ठराविक नतद्रष्ट लोकांकडून गावातील जातीय सलोखा व शांतता भंग करण्याचा प्रयत्न केला जात आहे. अशा लोकांकडून यापुढे असा प्रयत्न झाला तर कडक कारवाई केली जाईल, असा इशारा जिल्हा परिषदेचे माजी सदस्य राजेश परजणे यांनी दिला.

संवत्सर गावातील कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्नासंदर्भात राजेश परजणे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली दि. २ मे रोजी विशेष ग्रामसभा

पान ४

> आमची पोलीस यंत्रणा गुन्हेगारी चळवळीसाठी कोणासही पाठीशी घालणार नाही. गुन्हेगारी लोकांचा आम्ही बंदोबस्त करू. त्यांना तडीपार करण्याचे गुन्हे दाखल करू यापुढे आमची यंत्रणा सतर्क राहील. कायद्यामध्ये अनेक बदल झाल्यामुळे निर्णय घेणे पोलिस यंत्रणेला कधी कधी अवघड होते तरीसुद्धा अनेक गुन्हेगारास आम्ही अटक केलेली असून गावात दहशत पसरविणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करू.
>
> **- शिरिष वमने, पोलिस उपाधीक्षक**

# 'इफको'मुळे शेतकऱ्यांना खते खिशात घेवून शेती करता येणार : कोल्हे

**जनता आवाज वृत्तसेवा**



**निफाड :** इंडियन फारमर्स फर्टिलायझर कोऑपरेटिव्ह लिमिटेडच दि. २ मे रोजी निफाड येथे नॅनो खते, द्राक्ष व कांदा पीक परिसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून इफकोचे संचालक युवानेते विवेक कोल्हे यांनी उपस्थितांना संबोधित केले. अध्यक्षस्थानी अप्पर जिल्हाधिकारी नाशिक बाबासाहेब पारधे होते. साधना जाधव, संचालक इफको किसान फायनान्स नवी दिल्ली या प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या.

इफको संचालक युवानेते कोल्हे म्हणाले, शेतीसाठी खते आता खिशात घेऊन जाता येतील. जगभरातून मागणी होते आहे. अमेरिकेसारख्या प्रगत देशात नॅनो खते निर्यात होत आहेत. ब्राझील नेपाळ यासारख्या देशात मागणी होते आहे. नाविन्यपूर्ण संकल्पना असल्याने प्रतिसाद सुरूवातील कमी होता मात्र शेतकरी अनुभवाने आणि विश्वासाने दिवसेंदिवस मागणी वाढवत आहे.

नाशिक जिल्ह्यात द्राक्ष आणि कांदा उत्पादन मोठ्या प्रमाणात निर्मिती होत.निफाडमधील शेती धोरणाने जगाला दिशा देण्याचे काम आजवर केले

पान ४





# प्रवरेच्या वाटचालीत कामगारांचे योगदान

## डॉ. सुजय विखे पाटील; विखे पाटील कारखाना कामगार सेवानिवृत्त कार्यक्रम

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी : प्रवरेच्या कामगार हा आपल्या दृष्टीने कुटुंबाचा मुख्य घटक आहे. सहकार चळवळ वाढली पाहिजे, यासाठी सुरु असलेले आपल्या प्रयत्नाला खऱ्या अर्थाने कामगारांमुळे मोठे पाठबळ मिळाले आहे. आपण केलेल्या प्रामाणिक कामामुळे आज विखे पाटील कारखाना हा प्रगतीपथावर असून आपण दिलेले योगदान हे महत्त्वपूर्ण असल्याचे प्रतिपादन माजी खा. डॉ. सुजय विखे पाटील यांनी केले.**



पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखाना प्रवरानगर आणि साखर कामगार सभा यांच्या संयुक्त विद्यमाने कामगाल दिनाचे औचित्य साधत आयोजित कारखान्यातील सेवानिवृत्त कामगारांच्या सत्कार समारंभामध्ये डॉ. विखे पाटील बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी साखर कामगार सभेचे अध्यक्ष ज्ञानदेव आहेर होते. यावेळी कारखान्याचे अध्यक्ष कैलासनाना तांबे, उपाध्यक्ष सतीशराव ससाणे, सभा अध्यक्ष ज्ञानदेव ज्ञानदेव आहेर, कार्यकारी संचालक महेश कोनापुरे आदी उपस्थित होते.

डॉ. विखे पाटील म्हणाले, प्रवरेच्या सक्षम वाटचालीमध्ये प्रवरेच्या कामगारांचे योगदान हे महत्वपूर्ण राहिले आहे. प्रत्येक चढउतारामध्ये कामगार हे सोबत राहिले आहे. कारखान्याच्या प्रगतीमध्ये त्यांचा वाटा हा महत्त्वपूर्ण आहे. हा कार्यक्रम तुमच्यासाठी चांगला असला तरी माझ्या दृष्टीने वेदनादायी आहे. प्रवरेसाठी कायमच आपले योगदान देत रहा. विखे पाटील परिवाराच्या माध्यमातून कायमच सर्वांना बरोबर घेऊन सहकार चळवळ आणि सामाजिक कार्य सुरू आहेत. यामध्ये आपले योगदान हे महत्त्वपूर्ण राहिले आहे. येणाऱ्या नवीन हंगामामध्ये कारखान्याचे नुतणीकरण पूर्ण होणार आहे. यामुळे कारखान्याचे गाळप क्षमता ही वाढणार आहे.

निळवंडेचे पाणी असेल किंवा नदीजोड प्रकल्प असेल या माध्यमातून येणाऱ्या काळात शेतकऱ्यांना पाणी उपलब्ध करण्याबाबत योग्य तो निर्णय होणार आहे. सहकाराचे

पान ४

> कामगार, सभासद यांच्या दृष्टीने देखील चांगले निर्णय होतील. आज केवळ व्यक्तीदोषापोटी कारखान्यावरती आरोप होत आहेत. जे आरोप करतात, त्यांनी कारखान्यासाठी काय योगदान दिले. केवळ दिशाभूल करण्याचे काम काही ठराविक विरोधक करतात. पण त्यांना अनेक वेळा धडा शिकवला आहे आणि यापुढेही त्यांना त्यांची जागाही आपण सर्वजण मिळून दाखवून देणार आहोत. मंत्री विखे पाटील यांच्या माध्यमातून जलसंपदा विभागाच्या माध्यमातून होत असलेले काम हे जनतेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरत आहे.
>
> **- डॉ. सुजय विखे पाटील**

> विखे पाटील कुटुंबाने कामगारांची घेतलेली काळजी हे महत्वपूर्ण ठरली आहे. या माध्यमातून त्यांना योग्य असा न्याय देण्याचा प्रयत्न नेहमीच विखे पाटील परिवाराच्या माध्यमातून आणि कारखान्याच्या माध्यमातून झाला आहे. आज कामगारांची मुले-मुली शिक्षणांतून जागतिक पातळीवर हे केवळ मंत्री विखे पाटील यांच्यामुळे शक्य झाले आहे.
>
> **- ज्ञानदेव आहेर, साखर कामगार**

# सेवा हीच मनपाच्या कर्मचाऱ्यांची ओळख : आयुक्त यशवंत डांगे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर:** महानगरपालिका ही शहरातील नागरिकांना सेवा व सुविधा पुरवणारी संस्था आहे. कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून महानगरपालिका नागरिकांना सेवा पुरवते. प्रशासन आणि नागरिक यांच्यातील मुख्य दुवा म्हणून कर्मचारी वर्षानुवर्षे कर्तव्य बजावत आहेत. सेवा हीच या कर्मचाऱ्यांची ओळख आहे. कर्तव्यदक्ष राहून नागरिकांना चांगल्या सेवा पुरवून कर्मचाऱ्यांनी त्यांची ओळख जपावी. आजचा दिवस महाराष्ट्राच्या अभिमानाचा तर आहेच, पण जनतेच्या सेवेसाठी घेतलेल्या संकल्पाचा पुनःश्च निर्धार करणारा आहे, असे मत आयुक्त यशवंत डांगे यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र दिनानिमित्त आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांच्या हस्ते महानगरपालिकेत ध्वजारोहण करण्यात आले.



यावेळी कामगार दिनानिमित महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ अंतर्गत उत्कृष्ट सेवा देणाऱ्या महानगरपालिकेतील पाच कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. संतोष राठोड, चंद्रकांत आडेगोकूल, शेखर बनकर, सुरेखा सुरसे, शेख युनूस या कर्मचाऱ्यांना सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. मनपाच्या कर्मचाऱ्यांनी प्रामाणिक सेवेमुळे नागरिकांच्या मनात विश्वास निर्माण केला आहे. त्यामुळे कामगार दिनी त्यांचा गौरव करण्यात आला आहे. अहिल्यानगर महानगरपालिका नागरिकांच्या सेवेसाठी सदैव कटिबद्ध आहे.

# तिसगाववाडी येथे 'स्वामी समर्थ' सप्ताहाची सांगता



**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** श्री स्वामी समर्थ पुण्यतिथीनिमित्त तिसगाव प्रवरा येथील स्वामी समर्थ आध्यात्मिक व बालसंस्कार केंद्रात प. पू. गुरुमाऊली यांच्या प्रचंड आशीर्वादाने अखंड नाम, जप, वीणा वादन, यज्ञ याग, प्रहर सेवा या सेवेचे सप्ताहात नियोजन करण्यात आले होते.

ग्रामदेवता मानसन्मान ते विविध देवतांचे याग आणि गुरुचरित्र पारायण सांगता अतिशय उत्साहाने पार पाडले. यावेळी श्री गुरुचरित्र पारायणसाठी ९१ सेवेकरी यांनी भाग घेतला. तसेच एक हवनयुक्त गुरुचरित्र, भागवत पारायण, स्वामी चरित्र, दुर्गा सप्तशती, नवनाथ आदी सेवा करण्याचा लाभ मिळाला.

सप्ताहाच्या सांगतेच्या दिवशी प्रश्नउत्तर व याज्ञिकी सेवेकरी अरुण कडू यांनी 'गुरुमाऊली आणि त्यांचे कार्य' यावर मार्गदर्शन केले. तसेच याज्ञिकी व मार्गदर्शन सेवेकरी जयंत कडू यांनी मार्गाचे अठरा विभाग सक्षमीकरण यावर मार्गदर्शन केले आणि सप्ताहाची सांगता समारंभ महाराष्ट्राचे भैरव चंडी आणि सिद्धमंगल प्रतिनिधी बेबीताई कडू यांनी सध्या होऊ घातलेले उपक्रम यावर महिलांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या शेवटी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. सप्ताह यशस्वी होण्यासाठी ग्रामस्थ तसेच सर्व महिला व पुरुष सेविकाऱ्यांचे विशेष सहकार्य लाभले.

▶ महाराष्ट्र दिनानिमित्ताने नाशिक येथे प. पू गुरुमाऊली यांचा भव्य दिव्य राष्ट्रीय महासत्संग मेळावा, आज ३ मे रोजी सोलापूर, जालना, परभणी या जिल्ह्याची गोशाळा त्र्यंबकेश्वर येथे भैरव चंडी सेवा, २० मे रोजी जिजाऊ माता यांचे जन्मगाव माहेर घर सिंदखेड राजा येथे गुरुमाऊली यांचा महिला सक्षमीकरण यावर राष्ट्रीय महासत्संग, तसेच २७ जून ते ४ जुलै २०२५ या कालावधीत प. पू. गुरुमाऊली यांच्यासोबत मथुरा, वृंदावन येथे भागवत पारायण होणार आहे.

# तहसील कार्यालयात आ. काळेंच्या हस्ते ध्वजारोहण

## महाराष्ट्र दिनानिमित्त शाळा-महाविद्यालयासह विविध संस्थेतही ध्वजारोहण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी :** महाराष्ट्र दिन व कामगार दिन कोपरगाव तालुक्यात मोठ्या उत्साहात संपन्न झाला. महाराष्ट्र दिनानिमित्त शाळा-महाविद्यालय तसेच विविध शासकीय संस्था याठिकाणी मोठ्या उत्साहात ध्वजारोहण संपन्न झाले. कोपरगाव तहसील कार्यालयात देखील आ. आशुतोष काळे यांच्या हस्ते शासकीय ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी प्रशासकीय अधिकारी, विविध क्षेत्रातील मान्यवर, ज्येष्ठ नागरिक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आ. काळे यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत बलिदान देणाऱ्या हुतात्म्यांना





आदरांजली वाहिली. महाराष्ट्र दिन हा आपल्या राज्याच्या अस्मितेचा, अभिमानाचा आणि एकतेचा दिवस आहे. महाराष्ट्र राज्याला ऐतिहासिक, पौराणिक, समृद्ध सांस्कृतिक वारसा लाभला असून महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीसाठी अनेक हुतात्म्यांनी आपल्या जीवाचे बलिदान दिले आहे. हे बलिदान सार्थ ठरविने आपणा सर्वांचे कर्तव्य आहे.

यावेळी तहसीलदार महेश सावंत, पोलीस निरीक्षक संदीप कोळी, मुख्याधिकारी सुहास जगताप, तालुका कृषी अधिकारी मनोज सोनवणे, नायब तहसीलदार प्रफुल्लिता सातपुते, चंद्रशेखर कुलथे, कैलास ठोळे, माजी नगराध्यक्ष पद्माकांत कुदळे, विजयराव वहाडणे आदींसह शासकीय अधिकारी, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, माजी नगरसेवक, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

▶ महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीपासून प्रगतीच्या शिखराकडे वाटचाल करीत असलेल्या महाराष्ट्राकडे देशातील प्रगत राज्य म्हणून पाहिले जाते. आपण सर्वांनी मिळून महाराष्ट्राला सामाजिक, आर्थिक आणि औद्योगिकदृष्ट्या अधिक बळकट करण्यासाठी काम करणे गरजेचे असून राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी माझे योगदान सातत्याने देत राहणार आहे.

**- आशुतोष काळे, आमदार**

### आ. काळेंनी दिल्या कामगार दिनाच्या शुभेच्छा

▶ युवकांनी शिक्षण, नवनवीन कल्पना व कौशल्याच्या जोरावर पुढे येऊन समाजात सकारात्मक बदल घडवावा, असे आवाहन आ. आशुतोष काळे यांनी याप्रसंगी करून महाराष्ट्र दिन तसेच कामगार दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

# ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाकडून आघाडीची कामगिरी

## संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजच्या सात अभियंत्यांची नोकरीसाठी निवड



**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव :** संजीवनी इंजिनिअरींग कॉलेजच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाच्या प्रयत्नाने टीसीएस, आरस्केअरसॉफ्ट टेक्नॉलॉजिज व एसिअन हर्ट या कंपन्यांचा कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्ह आयोजीत केला होता. यात या तिन कंपन्यांनी कॉलेजच्या अंतिम वर्षातील सात नवोदित अभियंत्यांची चांगल्या वार्षिक पॅकेजवर नोकरीसाठी निवड केली आहे. अशा प्रकारे ट्रेनिंग अँड प्लेसमेंट (टी अँड पी) विभागाने एका पाठोपाठ एक अशा अनेक कंपन्यांमध्ये आपल्या विद्यार्थ्यांना नोकऱ्या मिळवुन देण्यात आघाडी घेतली आहे, अशी माहिती महाविद्यालयाने प्रसिध्दी पत्रकाद्वारे दिली आहे.

या कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्हमध्ये टीसीएस कंपनीने कॉम्प्युटर इंजिनिअरींगच्या ऋतिका रामचंद्र घावटे व अच्युत अजय सारंगधर यांची निवड केली आहे. आरस्केअरसॉफ्ट टेक्नॉलॉजिज कंपनीने कॉम्प्युटर इंजिनिअरींगच्या रोहित प्रकाश चव्हाण व इन्फर्मेशन टेक्नॉलॉजीच्या जालिंदरनाथ सुभाष कांगणे आणि तुषार सुधाकर पेटकर यांची निवड केली आहे. एसिअन हर्ट कंपनीने इन्फर्मेशन टेक्नॉलॉजीच्या सिध्दी सतीश आमले व अथर्व सचिन जोशी यांची निवड केली आहे.

संजीवनीच्या प्रयत्नाने ग्रामिण भागातील अनेक मुला मुलींना चांगल्या पगाराच्या नोकऱ्या मिळत असल्याने ते आपल्या कुटूंबाचा आधार बनत आहे. तसेच त्यांच्या पगाराचा पैसाही ग्रामीण भागात येत असल्याने ग्रामिण अर्थ कारणाला बळकटी मिळत आहे. दरवर्षी साधारण हजारपेक्षा अधिक विद्यार्थ्यांना संजीवनीच्या प्रयत्नातुन नोकऱ्या मिळवुन दिल्या जातात. यामुळे पालकांमध्ये समाधानाचे वातावरण असुन पालकांनी संजीवनीवर टाकलेला विश्वास सार्थ ठरत आहे.

▶ नोकरी असो, विविध स्पर्धा असो, परदेशातील इंटर्नशिप व एमएस असो, या सर्व आघाड्यांवर संजीवनी आघाडी घेत आहे, यामुळे पालकांचा संजीवनी पॅटर्नवरील विश्वास अधिकाधिक दृढ होत आहे. संजीवनीचे अध्यक्ष नितिन कोल्हे व मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे यांनी सर्व निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे अभिनंदन केले आहे.

# 'चर्मकार व्यावसायिकांसाठी व्यापारी संकुल उभारावे'

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव शहर :** कोपरगाव शहरात नुकत्याच झालेल्या अतिक्रमण विरोधी मोहिमेत गांधी चौक येथील अनेक वर्षांपासून असलेली चर्मकार व्यावसायिकांची दुकाने हटविण्यात आली आहे. या विस्थापित झालेल्या चर्मकार बांधवांना कायम स्वरूपी व्यवसाय करता येईल, अशा प्रकारे व्यापारी संकुल बांधून त्यांचे पुनर्वसन करावे. अशी मागणी कोपरगाव नगर परिषदेला एका निवेदनाद्वारे मुख्याधिकारी यांना करण्यात



आले.

तसेच व्यापारी संकुल बांधतांना मात्र रहदारीस अडथळा ठरणारे, सामाजिक स्वास्थ्य बिघडविणारे बेकायदेशीर काम होणार नाही व पुन्हा चर्मकार व्यावसायिकांना विस्थापित होण्याची वेळ येणार नाही. याची दक्षता घेण्याचीही विनंती निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

या निवेदनावर मराठा समाजातील विमल पुंडे, कमल नरोडे, आरती गाडे, शिल्पा पवार, रोहिणी पुंडे, रूपाली महाडिक, स्वाती हासे, चंद्रकला नरोडे, पुष्पा जगताप, सविता शिंदे, भारती साठे, मंदा कोते, बेबी बोडखे, संगीता गायकवाड, आशा साळुंके, जोती सुर्यवंशी, चंद्रकला आहेर, सुरेखा निकम, पुनम पाटील, सुमन खिलारी आदीसह अनेक महिलांच्या सह्या आहेत.

# 'गाव तिथे शाखा, घर तिथे मावळा' मोहीम राबविणार

## अनिलराव शेटे; शिवबा संघटना सभासद नोंदणी व कार्य अहवाल किल्ले रायगडावर संपन्न

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर :** छत्रपती शिवरायांच्या विचारांवर प्रेरित असणाऱ्या संघटनेचा सभासद नोंदणी शुभारंभ व कार्य अहवालाचे प्रकाशन श्री क्षेत्र किल्ले रायगडावर छत्रपती शिवरायांच्या चरणी कार्य अहवाल व सभासद नोंदणी अर्ज अर्पण वाहण्यात आला. छत्रपती शिवरायांच्या विचारांचा वसा आणि वारसा घेऊन राज्य कार्यक्षेत्र असलेली शिवबा संघटना सभासद नोंदणी करणार आहे.

यामध्ये समाजसेवेची आवड असणाऱ्या तरुणांना मोठ्या प्रमाणात सहभागी करून त्यांना विविध पदांवर काम करण्याची संधी देणार आहे. संघटनेच्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडवण्याचं काम सातत्याने सुरू असते. मात्र यापुढे प्रत्येक गावामध्ये प्रत्येक वस्तीवर शिवबा संघटनेचे सभासद तयार करून त्या त्या गावातील स्थानिक प्रश्न सोडवण्याचे काम संघटनेच्या माध्यमातून होणार असल्याचे



▶ संघटनेचा एक अल्पसा कार्य अहवाल प्रकाशित करण्यात आला. त्यामध्ये संघटनेच्या माध्यमातून पूरग्रस्तांना मदत, कोरोना काळात मदत, गड किल्ले संवर्धन, बळीराजाला सहाय्य, विद्यार्थी बांधवांसाठी केलेले काम, रक्तदान, आरोग्य शिबिरे अशा विविध कार्याच उल्लेख अहवालामध्ये करण्यात आला आहे. त्या माध्यमातून संघटनेचे कार्य तळागाळात पोहोचण्यासाठी मदत होईल.

**- सोमनाथ भाकरे**

संघटनेचे अध्यक्ष अनिलराव शेटे यांनी सांगितले. यावेळी संघटनेचे अध्यक्ष अनिलराव शेटे, दुर्ग संवर्धन समितीचे अध्यक्ष राजूभाऊ लाळगे, उपाध्यक्ष बाळासाहेब भंडारी, शिरूर तालुकाप्रमुख सोमनाथ भाकरे, युवक तालुकाप्रमुख केशव शिंदे, ओंकार जाधव, अभि गाडीलकर, संतोष साळुंखे, मच्छिंद्र लाळगे, ज्ञानेश्वर कवडे, शांताराम पाडळे, दत्ता टोणगे, गणेश भुकन, शशिकांत काळे, दत्तात्रय सोदक, निलेश वरखडे यांसह पदाधिकारी होते.

# महाराष्ट्र दिनानिमित्त विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**वैजापूर :** जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा बळ्हेगाव येथे महाराष्ट्र दिनानिमित्त इयत्ता पहिली ते सातवी या वर्गातून प्रथम, द्वितीय, तृतीय श्रेणीतून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना सन्मान चिन्ह व सन्मानपत्र वितरित करण्यात आले.

हे सन्मान चिन्ह व सन्मानपत्र बळ्हेगाव येथील साई शेतकरी गटाने एकत्रित निविष्ठा खरेदी, बियाणे खरेदी याच्यातून झालेल्या बचती मधून देण्यात



आले.मुख्याध्यापकांनी साई शेतकरी गटाचे मनःपूर्वक आभार मानले. त्यांनी सांगितले की, असे विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना उत्तेजना देण्याचे काम सर्वांनी करावे.

यावेळी शाळेचे मुख्याध्यापक अशोक सोनटक्के, वाडीले, ईश्वर ठुबे, रन येवले, तांबडा, सोमनाथ सूर्यवंशी, सरपंच, उपसरपंच, सदस्य, प्रगत शेतकरी, साई शेतकरी गटातील अध्यक्ष अनिल सूर्यवंशी, उपाध्यक्ष हरिभाऊ सूर्यवंशी, योगेश सूर्यवंशी, सूर्यवंशी, संतोष सूर्यवंशी, संतोष दिवेकर, सुनील सूर्यवंशी, संजय सूर्यवंशी, गणेश सूर्यवंशी

### भावी विद्यार्थी घडावा

▶ विद्यार्थ्यांना अभ्यास करण्यासाठी प्रेरणा मिळावी व विद्यार्थ्यांमध्ये अभ्यास करण्याची स्पर्धा तयार व्हावी, यातून भावी विद्यार्थी घडून यावा, या उद्देशाने साई शेतकरी गटाने हे उचललेले महत्त्वाचे पाऊल आहे.


### शेतकरी गटाकडून प्रमाणपत्र वितरित

▶ गावातील पाणी फाउंडेशन अंतर्गत फार्मर कप स्पर्धेत भाग घेऊन आपले उत्पन्न विषमुक्त घेतले. त्याबद्दल जिजाऊ महिला शेतकरी गट, शंभूराजे शेतकरी गट, सावित्री महिला शेतकरी गट या शेतकरी गटाने प्रमाणपत्र वितरित केले.

# रामचंद्र शिंदे यांचे निधन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** श्री कॉलनी, भूतकरवाडी येथील रहिवासी



रामचंद्र बाळाजी शिंदे (वय ८०, मूळ गाव देवठाण, अकोले) यांचे २९ एप्रिल रोजी निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम, अ.नगर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

# खर्डा ग्रामपंचायतीत बसवेश्वर जयंती उत्साहात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड :** खर्डा येथे ग्रामपंचायत कार्यालयात श्री संत महात्मा बसवेश्वर यांच्या ८९४ व्या जयंतीनिमित्त प्रतिमा पूजन सरपंच संजीवनी वैजिनाथ पाटील यांच्या हस्ते करून महात्मा बसवेश्वर जयंती साजरी करण्यात आली.

सरपंच संजीवनी पाटील म्हणाल्या की, महात्मा बसवेश्वर यांनी मानवता हा एकच धर्म असल्याचे सांगितले आहे. कुठलाही जातीभेद न करता मानव हा जगातील एकमेव श्रेष्ठ धर्म आहे. जर प्रत्येकाने समाजात वावरताना आपापसात मान सन्मानाने, प्रेमाने व माणुसकीने वागल्यास निश्चितच देशासह जगभरात शांतता प्रस्थापित होईल, असे जयंतीनिमित्त त्यांनी मार्गदर्शन केले.यावेळी ग्रामपंचायत सदस्य महालिंग कोरे, आर्ट ऑफ लिव्हिंगचे



प्रशिक्षक संतोष थोरात, शिवशंकर शेटे, राजू बरे, अँड. अमर कोरे, दत्तात्रय आंधळकर, नारायण कोरे, सुमित जमकावळे, राम वाले, सागर गुळवे, त्र्यंबक स्वामी, अशोक स्वामी, जगदीश शेटे, महेश बरे, प्रमोद खोबरे, पप्पू जंगम, प्रसाद जंगम, सोमनाथ बरे, उमेश कोरे, भैय्या विभुते, प्रदीप ढगे यांच्यासह लिंगायत बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# समतेची मिसळ हे एकतेचे प्रतीक

## माजी मंत्री बाळासाहेब थोरात; सामाजिक समतेच्या मिसळचा नागरिकांनी घेतला आस्वाद

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली एक तालुका एक परिवार ही संकल्पना राज्याला मार्गदर्शक ठरली आहे. महाराष्ट्र दिनानिमित्त विविध समाजातील नागरिकांनी एकत्र येऊन मोठ्या आनंदाने सामाजिक सलोखा व बंधुभाव वाढीसाठी डॉ. जयश्री थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली केलेल्या सामाजिक समतेच्या मिसळचा १५००० नागरिकांनी आस्वाद घेतला असून हा अभिनव उपक्रम देशासाठी दिशादर्शक ठरला आहे.

संगमनेर बस स्थानकासमोर नवीन नगर रोड येथे संगमनेर तालुका युवक काँग्रेस व विविध समाजातील नागरिकांनी एकत्र येऊन महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने समतेची मिसळ हा कार्यक्रम आयोजित केला.

यावेळी काँग्रेसचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात, मा. आ. डॉ. सुधीर तांबे, दुर्गाताई तांबे, उद्योजक राजेश मालपाणी, इंद्रजीत थोरात, गिरीश मालपाणी, आयोजक डॉ. जयश्री थोरात, डॉ. संतोष खेडलेकर यांच्यासह काँग्रेस व संगमनेरमधील ६० पेक्षा जास्त समाजांचे प्रतिनिधी व कार्यकर्ते उपस्थित होते.

माजी मंत्री थोरात यांच्या नेतृत्वाखाली संगमनेर शहर हे सुसंस्कृत आणि वैभवशाली शहर म्हणून ओळखले जाते. अनेक विकासाच्या योजना राबवताना बंधूभावाचे व सुरक्षिततेचे वातावरण हे संगमनेरचे वैशिष्ट्य राहिले असून महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने मानवता धर्म अधिक दृढ व्हावा या उद्देशाने डॉ. जयश्रीताई थोरात यांच्या संकल्पनेतून संगमनेर शहर व तालुक्यातील सर्व समाजाने एकत्र येऊन समतेची मिसळ हा



उपक्रम केला.

माजी मंत्री थोरात म्हणाले की, युवक काँग्रेसच्या पुढाकारातून विविध समाजातील नागरिकांनी एकत्र येऊन हा उपक्रम राबवला आहे. यामध्ये भेद नाही एकता आहे.भारतामध्ये सामाजिक विविधता आहे. मात्र मानवतेचा धर्म अधिक मजबूत होण्यासाठी ही एकत्रित मिसळ आहे.

### शिस्तप्रिय कार्यक्रमाचे सर्वत्र कौतुक

▶ महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने महाराष्ट्र धर्म वाढवणारा युवक काँग्रेसचा समतेचा मिसळ हा कार्यक्रम सर्वांनी मिळून यशस्वी केला. यामध्ये विविध समाजाच्या युवकांनी नागरिकांनी पुढाकार घेऊन विविध वस्तू एकत्र करून ही मिसळ केली. ३००० डझन पाव व विविध वस्तू असलेल्या या मिसळचा सर्वांनी अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने आस्वाद घेतला. या कार्यक्रमाचे राज्यभर मोठे कौतुक होत आहे.

### सुमारे १५००० नागरिकांची उपस्थिती

▶ महाराष्ट्र दिनानिमित्त नवीन नगर रोडवर सकाळपासूनच नागरिक महिला व युवकांची मोठी उपस्थिती या समतेच्या मिसळसाठी होती. यावेळी माजी मंत्री बाळासाहेब थोरात, डॉ. सुधीर तांबे, डॉ. जयश्रीताई थोरात, दुर्गाताई तांबे, इंद्रजीत थोरात या सर्वांनी आलेल्या प्रत्येकाची आवर्जून चौकशी करत सर्वांशी संवाद साधला. डॉ. संतोष खेडलेकर यांनी संगमनेरच्या सामाजिक समतेची परंपरा सर्वांना समजून सांगितली.







## माजी आमदार अरुणकाका जगताप यांचा अल्प परिचय

- **संपूर्ण नावः** श्री. अरुण बलभिमराव जगताप
- **जन्म दिनांकः** २५ मार्च १९५९ वयः ६६ वर्ष.
- शिक्षणः ५ वी पास. व्यवसायः शेती, हॉटेल व्यवसाय.
- **राजकीय इतिहासः** सन १९८६-१९८७ पासून युवक काँग्रेस चे शहराध्यक्ष म्हणून राजकारणास सुरुवात. सन १९८९ मध्ये विधानसभा निवडणूक अपक्ष लढवली. सन १९९१ ते १९९६ दरम्यान नगरपालिकेचे नगराध्यक्ष होते. सन १९९२ पासून आयुर्वेद शास्त्र सेवा मंडळ, वै.गंगाधर शास्त्री गुणे आयुर्वेद महाविद्यालय व हॉस्पिटल चे अध्यक्ष पदी नेमणूक व गुणे आयुर्वेद हॉस्पिटलच्या माध्यमातून रुग्णसेवा केली. सन १९९९ मध्ये विधानसभा निवडणूक अपक्ष लढवली. सन २००३ पासून अध्यक्ष, अहमदनगर जिल्हा क्रिकेट असोसिएशन तसेच सन २००८ पासून महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन सदस्यपदी नियुक्ती सन २००३ साली तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्याकडून अहमदनगर महानगरपालिका स्थापनेचा कलश शहरात आणला. सन २००५ साली श्री.संदिप कोतकर यांना महापौर करण्यात मोलाचे योगदान. सन २००६ साली माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी यांच्या उपस्थितीत शिवसेनेमध्ये जाहीर प्रवेश. सन २००८ अहमदनगर महानगरपालिकेच्या निवडणुकीत नगरसेवक म्हणून विजयी तसेच पुत्र संग्राम जगताप यांना महापौर केले. स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ, विष्णुपुरी, नांदेड चे सिनेट सदस्य पदावर नियुक्ती. दि. २३ डिसेंबर २००९ रोजीच्या विधानपरिषद निवडणुकीत आमदारपदी विजयी व दुसऱ्यांदा ३० डिसेंबर २०१६ रोजी विजयी. धाकटे चिरंजीव श्री.संग्रामभैय्या जगताप यांना सन २०१४, २०१९, २०२४ साली शहराचे आमदार म्हणून निवडून आणण्यात मोलाचे योगदान. जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या संचालकपदी निवड. थोरले चिरंजीव सचिनभाऊ जगताप यांना जिल्हा परिषदेचे सदस्यपदी निवडून आणण्यात मलाचे योगदान. सन २०२०-२०२१ कोरोना संकट काळात शहरातील व जिल्ह्यातील सर्वसमान्य गरजू नागरिकांना आधार देत धान्य पुरवठा करूनआरोग्य सुविधा देऊन अनेक हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या. तसेच आ.संग्राम जगताप यांच्या साथीने गुणे आयुर्वेद हॉस्पिटलमध्ये कोविड सेंटर सुरु करून ऑक्सिजन प्लांट उभारला. अध्यक्ष, अहमदनगर जिल्हा बॉडी बिल्डींग असो., अहमदनगर. राष्ट्रीय स्तरावरील राष्ट्रीय रत्न पुरस्काराने सन्मानित. अहमदनगरमध्ये प्रथमच राष्ट्रीय स्तरावर हिंदकेसरी कुस्ती स्पर्धेचे यशस्वी आयोजन केले.
- **सामाजिक कार्यः** राज्यस्तरीय मानाच्या महाराष्ट्र श्री बॉडी बिल्डींग स्पर्धेचे यशस्वी आयोजन. शहरातील धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रिडा, सांस्कृतिक इ. क्षेत्राला सहकार्य करत विविध कार्यक्रम घेण्याबाबत नेहमीच पुढाकार तसेच अनेक मंदिरे उभारून सर्व जातींच्या संतांचे सांस्कृतिक भवन उभारले.
- **स्वर्गवासः** दि.०५ एप्रिल रोजी पुण्यात रुबी हॉस्पिटल येथे उपचारासाठी दाखल. दि.०२ मे २०२५ रोजी पहाटे दुःखद निधन.

## नगर शहरातील व्यापारी क्षेत्रात शोकसागरः ईश्वर बोरा

### कै. अरुण काका जगताप यांना सामूहिक श्रद्धांजली




**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** नगर शहरातील प्रतिष्ठित व्यापारी नेते आणि सामाजिक कार्यकर्ते कै. अरुण काका बालभीमराव जगताप यांच्या निधनाने संपूर्ण व्यापारी समाजात शोककळा पसरली आहे. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आज सकाळी १०:३० वाजता वंदे मातरम चौकात सर्व व्यापारी बांधवांनी तसेच मित्र परिवार व सर्व आस्थापनांचे कर्मचारी यांनी एकत्र येऊन, अहिल्यानगर व्यापारी महासंघ, वंदे मातरम युवा प्रतिष्ठान आणि कापडबाजार श्री गणेश मित्र मंडळ यांच्या वतीने त्यांना सामूहिक श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात काकांच्या प्रतिमेला पुष्पवृष्टी करून करण्यात आली व त्यांना श्रद्धांजली पर सर्वांनी दोन मिनिटे मौन पाळले. यावेळी व्यापारी, कर्मचारी आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अहिल्यानगर व्यापारी महासंघाचे अध्यक्ष ईश्वर बोरा यांनी आपल्या मनोगतात सांगितले, ''अरुण काकांनी व्यापारी समाजासाठी केलेले कार्य अमूल्य आहे. त्यांच्या जाण्याने आपल्यात एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे. त्यांच्या आदर्शांचा आपण सर्वांनी आदर ठेवावा आणि त्यांच्या स्मृतीस अभिवादन करून मोठ्या संख्येने आपण सर्वांनी त्यांच्या अंत्ययात्रेत सामील व्हावे असे आव्हान त्यांनी यावेळी केले.''

वंदे मातरम युवा प्रतिष्ठानचे निवर्तमान अध्यक्ष प्रतीक बोगावत यांनी भावनिक शब्दांत व्यक्त केले, ''काकांचे मार्गदर्शन आणि प्रेम आम्हाला सदैव प्रेरणा देत राहील. त्यांच्या आठवणी आमच्या हृदयात सदैव जिवंत राहतील.''

कपडबाजार श्री गणेश मित्र मंडळाचे आणि व्यापारी मित्रांचे हितचिंतक बजरंग दलाचे श्री कुणाल भांडारी यांनी सांगितले, ''अरुण काकांचे सामाजिक योगदान आणि त्यांचे व्यक्तिमत्व हे नव्या पिढीसाठी आदर्श आहे. त्यांच्या विचारांचा वारसा आपण पुढे नेऊ आणि त्यांनी नगरच्या विकासात दिलेले योगदान आणि त्यांच्या मैत्रीचे वेगवेगळे उदाहरण देत त्यांच्या आठवणींना त्यांनी उजाळा दिला .''

या श्रद्धांजली कार्यक्रमानंतर, सर्व व्यापाऱ्यांनी एकमताने निर्णय घेतला की, आज दुपारी ५ वाजेपर्यंत सर्व आस्थापने बंद ठेवून काकांना श्रद्धांजली अर्पण करण्यात येईल.

यावेळी चिंटू खंडेलवाल, भैय्या भांडेकर, केतन मुथा, संदीप बायड, संभव काठेड, संतोष ठाकूर, सोनू गायकवाड, प्रकाश बायड, निलेश गुंदेचा, देवेंद्र भाटेजा, देवेंद्र दूधाळे, आदित्य गांधी, प्रदीप गोपलानी, अण्णा येणगंदुल, मनीष सोनग्रा, प्रतीक गोयल, तेजस डहाळे, ललित कटारिया, जवाहर गांधी, प्रणित नारंग, रवी गांधी, विक्रम नारंग, प्रणील बोगावात, किशोर तलरेजा, दीपक नवलानी दीपक तलरेजा आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नगर शहरातील व्यापारी समाजाने एकत्र येऊन कै. अरुण काका जगताप यांना दिलेली ही श्रद्धांजली त्यांच्या कार्याची आणि व्यक्तिमत्वाची साक्ष आहे.

# अरुणकाका जगताप यांना अखेरचा निरोप

## नगरकरांचा आधारवड हरपला; अंत्यविधीसाठी जनसागर लोटला





**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** विधान परिषदेचे माजी आमदार अरुणकाका जगताप यांच्यावर काल येथील अमरधामामध्ये शोकाकूल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी राजकीय, प्रशासकीय, सामाजिक क्षेत्रातील नागरिक उपस्थित होते. काकांच्या अंतिम दर्शनासाठी जिल्ह्यातील जनसागर लोटला होता. काकांच्या आठवणी काढीत अनेकांनी अश्रूंना मोकळ्या वाटा करून दिल्या.

गेल्या काही दिवसांपासून माजी आमदार अरुणकाका जगताप यांची शुक्रवारी पहाटे मृत्यूशी झुंज अपयशी ठरली. त्यांना उपचारार्थ पुणे येथील रुग्णालयात महिन्यापूर्वीच दाखल करण्यात आले होते. याची माहिती मिळताच अनेकांनी पुण्यातील रुग्णालयाकडे अनेकांनी धाव घेतली होती. उपचारासाठी व्यत्यय येवू नये म्हणून राष्ट्रवादीच शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर व माजी उपमहापौर गणेश भोसले यांनी काकांवर प्रेम करणाऱ्यांनी नगरमध्येच राहून प्रार्थना करावी पुण्याकडे येवू नये, असे आवाहन केले होते. परंतु, शुक्रवारी पहाटे अरुण काकांची प्राणज्योत मालवल्याची बातमी समजताच अहिल्यानगर शहरासह जिल्ह्यात शोककळा पसरली.

दिवंगत अरुणकाका जगताप यांनी युवक काँग्रेसच्या अध्यक्षपदापासून आपल्या राजकारणाचा श्रीगणेशा केला. नगरपालिकेत ते नगरसेवक झाले. सलग पाच वर्ष ते तत्कालीन अहमदनगर नगरपालिकेचे अध्यक्ष राहिले. दोनवेळा ते विधानपरिषदेवर निवडून गेले. अहमदनगर शहर मतदारसंघातून मात्र ते दोनवेळा पराभूत झाले. महापालिकेत ते पुन्हा नगरसेवक म्हणून निवडून आले. मात्र स्वत:ऐवजी त्यांनी त्यांचे चिरंजीव संग्राम जगताप यांना महापौर केले. जिल्हा बँकेचे संचालक म्हणूनही त्यांनी काम केले. आर्युवेद शास्त्र मंडळाचे अध्यक्ष म्हणून ते अनेक वर्षांपासून काम पाहत आहेत. जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी क्रीडा क्षेत्रात ठसा उमटवला. घोडेस्वारी, नव्या गाड्यांचा छंद. शेती, उद्योग, हॉटेल व्यवसायात त्यांना विशेष रुची होती.

तत्कालीन मुख्यमंत्री मनोहर जोशी यांच्या काळात त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला होता. मात्र ते सहा महिनेत तिथे रमले. पुन्हा राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये येऊन त्यांनी संघर्ष केला. जिल्हा काँग्रेसचे कार्याध्यक्षपदही त्यांनी सांभाळले होते. त्यांचे चिरंजीव संग्राम जगताप हे सलग तीनवेळा अहिल्यानगर शहर मतदारसंघातून निवडून आले तर दुसरे चिरंजीव सचिन हे जिल्हा परिषदेचे सदस्य होते. आमदार शिवाजीराव कर्डिले आणि भानुदास कोतकर यांचे ते व्याही होते.

### उपमुख्यमंत्री अजित पवार यांची श्रद्धांजली

माजी आमदार श्री. अरुणकाका जगताप यांच्या दुःखद निधनानं राजकारण, समाजकारण, कला, क्रीडा, शिक्षण, सहकार अशा अनेक क्षेत्रात कार्यरत असलेलं, सामान्यांची घट्ट नाळ जुळलेलं कर्तृत्ववान नेतृत्व हरपलं आहे. तत्कालीन अहमदनगर नगरपालिकेचे अध्यक्ष, जिल्हा क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष, आयुर्वेद शास्त्र मंडळाचे अध्यक्ष, प्रयोगशील शेतकरी, वारकरी संप्रदायाचा सच्चा पाईक म्हणून ते कायम अहिल्यानगरवासियांच्या लक्षात राहतील. त्यांचे निधन ही अहिल्यानगर जिल्ह्याची मोठी आणि असून त्यांच्या निधनाचा धक्का पचवण्याची शक्ती त्यांचे पुत्र आमदार संग्राम जगताप, संपूर्ण जगताप कुटुंबीय आणि कार्यकर्त्यांना मिळो, अशी प्रार्थना करतो. आम्ही सर्वजण जगताप कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहोत. दिवंगत अरुणकाकांच्या आत्म्यास सद्गती लाभो, ही प्रार्थना.,'' अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी माजी आमदार श्री. अरुणकाका जगताप यांच्या निधनाबद्दल दुःख व्यक्त करून श्रद्धांजली वाहिली आहे.

### अहोरात्र काम करणारा नेता गमावला : ना. विखे

लोणी : माजी आमदार स्वर्गीय अरुणकाका जगताप यांच्या निधनाने सदैव लोकांसाठी अहोरात्र काम करणारा नेता आपण गमावला असल्याची भावना व्यक्त करीत, जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी आपली श्रध्दांजली अर्पन केली आहे. आपल्या शोकसंदेशात मंत्री विखे पाटील यांनी म्हटले आहे की, अरुणकाकांच्या निधनाची घटना ही मनाला वेदना देणारी आहे. मागील काही दिवसांपासून पुणे येथील रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरु होते अरुणकाकांच्या जाण्यामुळे लोकांसाठी अहोरात्र काम करणारे एक नेतृत्व जिल्ह्याने गमवाले आहे. युवक संघटने पासून स्वत:ची एक वेगळी ओळख जिल्ह्याच्या राजकारणात त्यांनी निमर्ण केली होती. नगराध्यक्ष पद ते विधान परिषदेचे सदस्य असा त्यांचा राजकारणाचा प्रवास हा केवळ लोकांसाठी होता. क्रिडा क्षेत्राची अत्यंत आवड असलेला एक क्रिडा प्रेमी म्हणून आ.जगताप यांची ओळख ही सर्वदुर होती. त्यांच्या जाण्याने जगताप कुटूंबावर मोठे संकट ओढवले आहे. या संकटातून आ.संग्राम जगताप आणि त्यांच्या कुटूंबियांना बाहेर पडण्याची शक्ती परमेश्वराने द्यावी.

### उल्लेखनीय नेतृत्व हरपलेः आ. खताळ

माजी विधान परिषद सदस्य, आणि माझे विधानसभेतील सहकारी मित्र आ. संग्राम भैय्या जगताप यांचे वडील व आमचे मार्गदर्शक अरुणकाका जगताप यांच्या जाण्याने अहिल्यानगर मधील राजकीय, सामाजिक, क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेले एक नेतृत्व आज आपल्यातून निघून गेले आहे. यांच्या अकाली निधनाने समाजकार्य, राजकारण आणि शैक्षणिक क्षेत्रात एक पोकळी निर्माण झाली आहे ती पोकळी भरून निघणं अत्यंत कठीण आहे. राजकारण, समाजकारण आणि माणुसकी यामध्ये समरस झालेला दिलदार मनाचा माणूस आज आपल्यातून निघून गेला हे अत्यंत दुःखद आहे. त्यांच्या जाण्याने आमदार संग्राम भैय्या जगताप आणि त्यांच्या सर्व कुटुंबीयांला दुःख झाले आहे. त्यातून सावरण्याची ईश्वराने त्यांना शक्ती देवो. मी आणि माझा संपूर्ण मतदारसंघ त्यांच्या दुःखात सहभागी आहे. अरुण काकांच्या आत्म्यास चिरःशांती लाभो, अशी प्रतिक्रीया आमदार अमोल खताळ यांनी व्यक्त केली.

### धनंजय मुंडे यांनी केले दुःख व्यक्त

माजी विधान परिषद सदस्य, माझे सहकारी आ. संग्राम भैय्या जगताप यांचे वडील व आमचे मार्गदर्शक अरुणकाका जगताप यांच्या निधनाचे वृत्त दुःखद आहे. त्यांच्या जाण्याने राजकारण, समाजकारण, क्रीडा, सहकार आदी क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेले एक नेतृत्व काळाच्या पडद्याआड गेले आहे. जगताप कुटुंबियांवर कोसळलेल्या या दुःखात मी सहभागी आहे. ईश्वर स्व.अरुण काकांच्या आत्म्यास चिर:शांती प्रदान करो. भावपूर्ण श्रद्धांजली. अशा शब्दात माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी दुःख व्यक्त केलं आहे.

### आनंदयात्री अनंताच्या प्रवासाला निघून गेलेः पवार

माजी आमदार अरुणकाका जगताप यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. हिवरे बाजार परिवारातील एक सदस्य आणि हिवरे बाजारच्या कुस्तीवर नितांत प्रेम करणारे होते. त्यांच्या अचानक जाण्यामुळे हिवरे बाजार परिवाराला अतीव दुःख झाले असून एक आनंदयात्री अनंताच्या प्रवासाला निघून गेल्याची प्रतिक्रिया पद्मश्री पोपटराव पवार यांनी दिली. आम्ही हिवरे बाजार परिवार जगताप कुटुंबीयांच्या दु:खात सहभागी असून त्यांना हिवरे बाजार परिवाराच्या वतीने अखेरची भावपूर्ण आदरांजली.

### अभ्यासू नेतृत्व हरपलेः लोकनेते थोरात

विधान परिषदेचे माजी सदस्य तथा जिल्ह्यातील ज्येष्ठ नेते अरुण काका जगताप यांच्या निधनाची बातमी अत्यंत दुःखदायक आहे त्यांच्या निधनाने जगताप कुटुंबीयांवर आलेल्या दुःखात आम्ही सहभागी आहोत अरुण काका जगताप यांनी सातत्याने अहिल्यानगर शहराच्या विकासासाठी मोठे काम केले असून त्यांच्या निधनाने जिल्ह्यातील एक अभ्यासू नेतृत्व हरपले असल्याची भावना काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी व्यक्त केली आहे.

### रोहित पवार यांची जगताप यांना श्रद्धांजली

विधानपरिषदेचे माजी आमदार स्व. अरुणकाका जगताप यांच्या अकस्मात जाण्याने जनतेच्या हितासाठी सतत झटणारं नेतृत्व आपल्यातून काळाच्या पडद्याआड गेलं आहे. तत्कालीन अहमदनगर नगरपालिकेचे अध्यक्ष, जिल्हा क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष, आयुर्वेद शास्त्र मंडळाचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी यशस्वीपणे धुरा सांभाळली. राजकारण, सहकार, क्रीडा, शिक्षण आणि सामाजिक कार्यात त्यांनी दिलेले भरीव योगदान अहिल्यानगरच्या जडणघडणीत अविस्मरणीय आहे. त्यांची नम्रता, कार्यकुशलता आणि सर्वसामान्यांशी असलेली जवळीक कायम स्मरणात राहील.

### जनतेचा कैवारी हरपलाः आ. काळे

जनतेशी नेहमी संवाद ठेवणारे आणि प्रत्येक समस्येकडे संवेदनशीलपणे पाहणारे माजी आमदार अरुणकाका जगताप यांच्या निधनाने एक अनुभवी, समाजाभिमुख आणि जनतेच्या हितासाठी काम करणारा नेता हरपला आहे. समाजाशी नाळ जोडलेला व सदैव समाज कार्याला वाहून घेतलेला नेता अशी आपली वेगळी ओळख निर्माण करून जिल्हाच नव्हे तर संपूर्ण राज्याचे ते काका झाले होते. अहिल्यानगर जिल्ह्याच्या जडणघडणीत त्यांचा मोठा वाटा होता. त्यांच्या सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, सहकार आणि राजकीय कार्याची आठवण सदैव मनात राहील. त्यांच्या अकाली निधनाने समाजकार्य, राजकारण आणि शैक्षणिक क्षेत्रात एक पोकळी निर्माण झाली आहे

### समरस असलेले व्यक्तीमत्व हरपलेः आ. तांबे

अरुण काका जगताप हे माझे वडील डॉ. सुधीर तांबे यांचे अत्यंत जवळचे मित्र होते. ९०च्या दशकात अरुण काका नगर शहरात तर माझे वडील संगमनेरमध्ये एकाच वेळी नगराध्यक्ष झाले आणि त्यानंतर दोघेही विधान परिषदेचे सदस्य झाले.संग्राम भैय्या आणि माझेही मैत्रीपूर्ण संबंध आहेत. तसेच त्यांचा ज्येष्ठ सुपुत्र सचिन भाऊ आणि मी एकत्र जिल्हा परिषदेमध्ये दहा वर्षे काम केले होते. राजकारण, समाजकारण आणि माणुसकी यामध्ये समरस झालेला दिलदार मनाचा माणूस आज आपल्यातून निघून गेला हे अत्यंत दुःखद आहे. संपूर्ण जगताप कुटुंबीयांच्या आणि सर्व नगरकरांच्या या दुःखात मी सहभागी आहे.

## मोची गल्लीतील दुकानदारांच्यावतीने अरुणकाका जगताप यांना श्रध्दांजली

### दुकाने बंद ठेवून व्यापारी दुःखात सहभागी




**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** जिल्ह्याचे ज्येष्ठ नेते व माजी आमदार अरुणकाका जगताप यांच्या निधनानंतर कापड बाजार, मोची गल्ली मधील व्यापाऱ्यांनी आपले व्यवहार बंद ठेवून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली. शुक्रवारी (दि.२ मे) सकाळपासूनच बाजारपेठेत गहिवरलेले वातावरण होते. दुकानदारांनी स्वयंस्फूर्तीने व्यवहार बंद ठेवत आपले दुःख व्यक्त केले.

मोची गल्लीतील सर्व व्यापाऱ्यांनी एकत्र येऊन आपला व्यवसाय बंद ठेवला होता. या बंदसाठी मोची गल्ली व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष मन्सूरभाई शेख यांनी आवाहन केले होते, ज्याला संपूर्ण व्यापाऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. अरुणकाका जगताप यांच्या निधनाची बातमी कळताच संपूर्ण परिसरात शोककळा पसरली. दुकाने बंद असल्यामुळे कापड बाजार आणि मोची गल्लीत नेहमीचा गजबजाट दिसून आला नाही. बाजारपेठेत शुकशुकाट होता.

अरुणकाका जगताप यांचे बाजारपेठेतील प्रत्येक जाती-धर्माच्या व्यापारी आणि दुकानदारांशी जिव्हाळ्याचे संबंध होते. त्यांच्या निधनाची बातमी अत्यंत दुःखद व नगरकरांच्या मनाला चटका लावणारी आहे. अहिल्यानगरच्या राजकारणात, समाजसेवेत त्यांचे अमूल्य असे योगदान राहिले. त्यांच्या निधनाने शहराचे मोठे नुकसान झाले असून, दूरदृष्टीचा नेता गमावला असल्याची भावना मन्सूरभाई शेख यांनी व्यक्त केली.

## ज्येष्ठ नेते अरुणकाका जगताप यांना हरदिन मॉर्निंग ग्रुपकडून श्रद्धांजली

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** जिल्ह्याचे ज्येष्ठ नेते व माजी आमदार अरुणकाका जगताप यांच्या दुःखद निधनानंतर शहरातील हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने शुक्रवारी (दि.२ मे) भगवान गौतमबुद्ध जॉगिंग पार्क येथे श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी हरदिनचे सदस्य तसेच व्यायामासाठी आलेले नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी सामूहिकरीत्या दुःख व्यक्त करत जगताप कुटुंबियांच्या दुःखात सहभागी असल्याचे स्पष्ट केले.

या श्रद्धांजली कार्यक्रमादरम्यान नागरिकांनी व्यायाम सत्र स्थगित करून शांततेत शोक व्यक्त केला. याप्रसंगी हरदिनचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, अहिल्यानगर कापड व्यापारी संघाचे उपाध्यक्ष सचिनशेठ चोपडा, डॉ. नानासाहेब अकोलकर, उद्योजक संतोष लुणिया, विकास भिंगारदिवे, कांताबाई झंवर, सुनिता चव्हाण, प्रांजली सपकाळ, आराध्या परदेशी, संगीताताई भिंगारदिवे, सुवर्णाताई महागडे-भिंगारदिवे, रमेश वराडे, दीपकराव धाडगे, रतनशेठ मेहेत्रे, दिलीपराव ठोकळ, ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज अनावडे, मनोहर दरवडे, सुधीरशेठ कपाले, सर्वेश सपकाळ, विलास आहेर, जहीर सय्यद, अभिजीत सपकाळ, दिलीप गुगळे, दीपकराव घोडके, सरदारसिंग परदेशी, राजू कांबळे, अशोक पराते, अविनाश पोतदार, सुभाष पेंढुरकर, अनिलराव हळगावकर, शेषराव पालवे, सुभाष गोंधळे, प्रकाश देवळालीकर, कुमार धतुरे, संतोष हजारे, सूर्यकांत कटोरे, नामदेवराव जावळे, चुनीलाल झंवर, श्रीरंग देवकुळे, विकास निमसे, सूर्यकांत कटोरे, विजय महाजन, सचिन जाधव, रवी फल्ले, सुनील शिंदे, रावसाहेब हंचे, दशरथराव मुंडे, नवनाथ खराडे, तुषार घाडगे, बाळासाहेब झिंजे, बाळासाहेब गोंधळे, किरण गायकवाड, मारुतीराव खराडे, महेश सरोदे, सुहास देवराईकर, शशांक अंबावडे आदी नागरिक महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. संजय सपकाळ म्हणाले की, अरुणकाका जगताप यांच्या निधनाने सामाजिक व राजकीय चळवळीचे मोठे नुकसान झाले आहे. सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांसह त्यांचे चांगले संबंध होते. त्यांनी नेहमीच विकासाचे राजकारण केले. आपल्या कार्यकर्त्यांना दिशा देण्याचे त्यांनी कार्य केले. त्यांच्या रुपाने जिल्ह्यातील कर्तृत्ववान नेतृत्व हरपलं आहे. भिंगारच्या विकासासाठी देखील त्यांचे मोलाचे योगदान राहिले असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.



# संपादकीय

## देशाच्या भात्यातले नवे वैभव

आयपीएल सामन्यांमध्ये विशेष चमकल्यामुळे चर्चेत आलेल्या वैभव सूर्यवंशीने वयाच्या चौदाव्या वर्षी आयपीएलमध्ये शतक झळकावल्यामुळे आणि अशी कामगिरी करणारा तो जगातील सर्वात तरुण फलंदाज ठरल्याने सर्वत्र वाहवाही होत आहे. वैभवने अलिकडेच गुजरात टायटन्सविरुद्ध ३५ चेंडूंमध्ये १०१ धावांची खेळी केली. तो या लीगमध्ये सर्वात जलद शतक झळकावणारा भारतीय ठरला. वैभव आयपीएलमध्ये पदार्पण करणारा सर्वात तरुण खेळाडू ठरला. त्याने अवघ्या देशाला खुश केले, पण हा प्रवास सोपा नव्हता. त्याला आणि त्याच्या कुटुंबाला आजचा दिवस पाहण्यासाठी अनेक संघर्षांचा सामना करावा लागला आहे. वडिलांनी त्याच्या क्रिकेट कारकिर्दीसाठी आपली जमीन विकली. वैभवच्या वयाबाबतही प्रश्न उपस्थित केले जात होते; पण आपल्या ताकदीने आणि जिद्दीच्या जोरावर त्याने सर्वांनाच आपली लायकी मान्य करायला लावली. पहिल्याच आयपीएल सामन्यात २० चेंडूत ३४ धावांची खेळी ही वैभवच्या प्रतिभेची झलक होती. यानंतर वैभवने छोटी पण धाडसी खेळी खेळून आपले कौशल्य दाखवून दिले. आता त्याने शतक झळकावून आपली ताकद जगाला दाखवून दिली आहे. हे सर्व घडत असताना १४ वर्षांचा मुलगा त्याच्या स्ट्रोकमध्ये इतकी शक्ती कशी निर्माण करू शकतो की उच्चस्तरीय हल्ल्यासदृष चेंडूंना तोंड देत असताना चेंडू एकदाच नव्हे, तर अनेक वेळा स्टँडम ध्ये पाठवू शकतो, असा प्रश्न पुढे आला. मात्र यावर असे स्पष्टीकरण पुढे येते की ताकदीपेक्षा युक्ती महत्त्वाची असते. वैभवने पाच वर्षांचे खडतर प्रशिक्षण घेतले. त्यात तो दररोज ६०० चेंडू खेळायचा. बिहारमधील समस्तीपूरच्या या मुलाने अनेक अनुभवी गोलंदाजांना षटकार ठोकले. प्रशिक्षक ब्रजेश झा यांनी त्याच्यातील विशेष प्रतिभा ओळखली आणि वयाच्या नवव्या वर्षापासून वैभवला अशा प्रकारे तयार केले की संधी मिळाली तेव्हा तो आव्हानासाठी तयार होता. वैभवची प्रतिभा एका रात्रीमध्ये उदयाला आली नाही. वडील संजीव सूर्यवंशी यांनी त्यांच्या मुलाची क्रिकेटची स्वप्ने पूर्ण करण्यासाठी परिवाराच्या मालकीची शेतजमीन विकली तेव्हा या अविश्‍वसनीय कथेचा पाया रचला गेला. 'बिहार क्रिकेट असोसिएशन'ने वैभवला पाठिंबा देत रणजी ट्रॉफीमध्ये स्थान मिळवून दिले. टिळक नायडू यांच्या नेतृत्वाखालील १९ वर्षाखालील राष्ट्रीय निवडकर्त्यांनी कसोटी क्रिकेटमध्ये त्याची निवड केली. वैभवचे वडील त्याला सामने दाखवण्यासाठी अनेकदा शंभर किलोमीटरचा प्रवास करायचे. आई त्याच्या खाण्यापिण्याच्या गरजांची अचूक काळजी घेत होती. एखादी व्यक्ती दररोज ६०० चेंडू खेळत असेल तर त्याला प्रथिनांच्या बाबतीत अधिक पोषण आवश्यक असेल. वैभवचे प्रशिक्षक झा सांगतात, 'आठ वर्षांचा असताना वैभवचे वडील संजीव माझ्याकडे घेऊन आले. प्रत्येक मूल वेगळे असते; पण मी त्या वयाच्या इतर मुलांकडे पाहिले, तर त्याला जे काही शिकवले जाते ते अंमलात आणण्याची समज त्याच्यात होती. त्याची बॅटींगची पद्धत, बॅक-लिफ्ट, शॉटची निवड, हेतू हे सर्व हुशारी सिध्द करण्यास पुरेसे होते.

वैभवने आयपीएलमधील तीन सामन्यांमध्ये ७५.५० च्या सरासरीने आणि २२२.०५ च्या उत्कृष्ट स्ट्राइक रेटने १५१ धावा केल्या. तो आयपीएलमध्ये सर्वात कमी डावांमध्ये शतक करणारा भारतीय ठरला. गेल्या वर्षी जेद्दाह आयपीएल मेगा लिलावात वैभव हा सरप्राईज खेळाडू होता. त्यानंतर या १३ वर्षीय खेळाडूला राजस्थान रॉयल्सने १.१ कोटी रुपयांना खरेदी केले. २७ मार्च २०११ रोजी बिहारमध्ये जन्मलेला वैभव हा लिलावात विकला जाणारा सर्वात तरुण खेळाडू आहे; मात्र लिलावात हा युवा क्रिकेटर करोडपती होताच वादाला सुरुवात झाली. त्याच्या वयापुढे प्रश्‍नचिन्ह उपस्थित केले जात होते; मात्र वैभवचे वडील बेफिकीर राहिले आणि टीकाकारांना चोख प्रत्युत्तर दिले. आपण कोणाला घाबरत नाही आणि जी काही माहिती दिली आहे ती बरोबर आहे, असे त्यांनी सांगितले. समस्तीपूरपासून १५ किलोमीटर अंतरावर असलेल्या मोतीपूर गावात मुलाच्या क्रिकेटसाठी शेती विकणाऱ्या संजीव यांच्याकडे मुलगा लिलावात करोडपती झाल्यानंतर शब्दच नव्हते. वैभव आता केवळ आपला मुलगा नसून संपूर्ण बिहारचा मुलगा आहे, असे त्यांनी त्यावेळी म्हटले होते. संजीव यांच्या म्हणण्यानुसार, वैभवने वयाच्या आठव्या वर्षी कठोर परिश्रम केले आणि जिल्ह्याच्या १६ वर्षाखालील चाचण्यांमध्ये यश मिळवले. वैभवच्या वयाबाबतच्या वादावर बोलताना संजीव म्हणाले होते की साडेआठ वर्षांचा असताना 'बीसीसीआय'ने त्याच्या हाडांची चाचणी केली होती. वैभवने देशांतर्गत क्रिकेटमध्ये चमक दाखवली आहे. त्याने जानेवारी २०२४ मध्ये बिहारसाठी प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये पदार्पण केले, तेव्हा तो फक्त बारा वर्ष आणि २८४ दिवसांचा होता. गेल्या वर्षी तो चेन्नईमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या भारताच्या अंडर-१९ सामन्यात सहभागी झाला होता. तेव्हा त्याने ५८ चेंडूंमध्ये शतक झळकावले होते. यासह वैभव अंडर-१९ कसोटीमध्ये सर्वात वेगवान शतक झळकवण्याचा विक्रम झळकवणारा खेळाडू ठरला. या युवा खेळाडूने आपल्या दमदार खेळीत १४ चौकार आणि चार षटकार मारले. अवघ्या ६२ चेंडूंमध्ये १०४ धावा करून तो धावबाद झाला. सय्यद मुश्ताक अली करंडक टी २० टूर्नामेंट २०२४ दरम्यान त्याने बिहारसाठी टी २० पदार्पणदेखील केले. तो एसीसी अंडर १९ आशिया कप २०२४-२५ मध्ये सर्वाधिक धावा करणारा सातवा खेळाडू ठरला. त्याने स्पर्धेतील पाच सामन्यांमध्ये १७६ धावा केल्या, ज्यात त्याची सर्वोच्च धावसंख्या ७६ होती. १४ वर्षांच्या या मुलाने परवा क्रिकेटच्या इतिहासात लिहिलेला अध्याय पुढील अनेक वर्षे स्मरणात राहील. गुजरात टायटन्सविरुद्ध खेळताना राजस्थान रॉयल्सच्या या युवा फलंदाजाने ३५ चेंडूंमध्ये ११ षटकार आणि ७ चौकारांसह १०१ धावांची अप्रतिम खेळी खेळली. वैभवची ही खेळी केवळ त्याचे पहिले आयपीएल शतकच नाही, तर लीगमधील सर्वात तरुण क्रिकेटपटूचेही शतक ठरले. वैभवच्या या खेळीनंतर त्याला आयपीएलमधून नवे नाव मिळाले आहे. तो केवळ १४ वर्षांचा आहे; पण मैदानावर सामान्य फलंदाजाप्रमाणे ९० मीटर लांब षटकार मारत आहे. त्यामागचे कारण होते लहान हातात बॅट पकडण्याची कला. त्याच्या शतकानंतर एक जुना व्हिडीओ 'सोशल मीडिया'वर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. तो त्याच्या कठोर परिश्रम, समर्पण आणि उत्कटतेची अनोखी कहाणी सांगतो.

# शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलावा

**तंत्रवेध**

**– डॉ. दिपक शिकारपूर**



आजचे बारा वर्षांचे शालेय शिक्षण नवीन तंत्राने आठ वर्षांमध्ये देता येईल. संगणकीकृत दूरशिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांना स्वस्त उच्च शिक्षणाकडे वळता येईल. शिक्षित आणि रोजगारांचे प्रमाण वाढले, पुरेशी अर्थप्राप्ती होऊ लागली की सामाजिक वातावरणात फरक पडून शांतता नांदेल आणि एकी वाढेल. या परिवर्तनाची दिशा समजून घेऊन पालकांनी मुलामुलींना पुस्तकातले किडे न बनवता नानाविध कौशल्ये आत्मसात करू द्यायला हवीत.

आजघडीला आपला देश संक्रमणावस्थेतून जात आहे. विविध आघाड्यांवरच्या प्रगतीचा किंवा विकासाचा वेग किंचित मंदावल्यासारखा दिसतो आहे खरा. मंदीचे ढग अजूनही क्षितिजावर रेंगाळत आहेत, ते पूर्णपणे दिसेनासे झालेले नाहीत. पण सगळेच चित्र निराशाजनक नक्कीच नाही. विकासाचा, वाढीचा, उत्पादनाचा वेग मंदावला आहे, परंतु थांबलेला नाही. ही अवस्था लवकरच जाईल. जगात अशा रितीने चिरंतन किंवा शाश्‍वत काहीही नसते 'वसुधैव कुटुंबकम' ही आपली संस्कृती असून देशाच्या काम गिरीचा प्रभाव सध्या संपूर्ण जगावर पडत आहे. जगाच्या कल्याणासाठी भारताचे मोठे योगदान आहे. १२ मे २०२० रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदींनी 'आत्मनिर्भर भारत' अभियानाची हाक दिल्यापासून विविध प्रसारमाध्यमांमधून त्याबाबत चर्चा सुरू आहे. स्वावलंबी भारत अर्थव्यवस्था, पायाभूत सुविधा, २१ व्या शतकातील तंत्रज्ञानाद्वारे चालवलेल्या व्यवस्थांवर आधारित पद्धत, व्हायब्रंट डेमोग्राफी (युवा सामर्थ्य) आणि मागणी या पाच स्तंभांवर उभा असेल. याद्वारे आमच्या मागणी आणि पुरवठा साखळीची ताकद संपूर्ण क्षमतेसाठी वापरली जावी, अशी अपेक्षा आहे. सध्याच्या वैश्‍विकरणाच्या जमान्यात अर्थातच राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय अशी कप्पेबंदी करता येणार नाही. जागतिक पुरवठा साखळीत आपल्याला महत्त्वाची भूमिका निभावता येईल, अशी बारा क्षेत्रे अधोरेखित केली गेली आहेत. अन्न प्रक्रिया, सेंद्रिय शेती, लोह, अल्युमिनियम आणि तांबे, कृषि-रसायने, इलेक्ट्रॉनिक्स, औद्योगिक यंत्रसामग्री, फर्निचर, चर्मोद्योग, ऑटोमोबाइल पार्टस, वस्त्रोद्योग आणि मुखावरणे, सॅनिटायझेशन आणि वेंटिलेटर्स ही ती क्षेत्रे आहेत.

संगणकापासून संरक्षण उत्पादनांपर्यंत आपण आत्म निर्भर झालो, 'मेक इन इंडिया'चा आग्रही पुरस्कार करत स्वतःच्या पायावर उभे राहिलो, तर भविष्यात उद्भवू शकणाऱ्या सर्व पेचप्रसंगांना यशस्वीपणे तोंड देऊ शकू. ऊर्जा, पाणी, संरक्षण उत्पादन, तंत्रज्ञान, औषध निम र्णिण अशा अनेक क्षेत्रांमध्ये आपण आणखी आत्मनिर्भर होण्याची गरज आहे. त्यासाठी कुशल मनुष्यबळ निम र्णिण करावे लागेल. स्थानिक मनुष्यबळाची मानसिकता बदलावी लागेल आणि त्यांनी नवी कौशल्ये आत्मसात करावी लागतील. या दिशेने प्रयत्न करणे हा आत्मनिर्भर होण्यासाठीच्या धडपडीचाच भाग ठरेल. आपण एक आर्थिक महासत्ता होण्याचा प्रयत्न करू आणि या मोहिम ेत आपले लढवय्ये असतील हे कुशल मोहरे. माझ्या दृष्टीने आयटी या शब्दप्रयोगाचा अर्थ आहे इंडियाज टॅलेंट. देशाची वाढती लोकसंख्या ही पहिल्यापासून एक फार मोठी समस्या मानली गेली असून त्यानुसार, लोकसंख्या काबूत ठेवण्यासाठी २५-३० वर्षांपूर्वी कुटुंब नियोजन, नसबंदी शस्त्रक्रिया वगैरे उपायही केले गेले. त्या काळातली विचारप्रणाली वेगळी होती. इतक्या मोठ्या लोकसंख्येला शिक्षण आणि प्रशिक्षण देऊन जागतिक पातळीवर आर्थिक सत्ता बनण्यासाठी करता येईल हे फारसे कोणाला सुचले नाही.

आज मात्र वेगळ्या दिशेने विचार करून आपल्याकडे भरपूर प्रमाणात असलेल्या म नुष्यबळाचा योग्य रितीने वापर करण्याची वेळ आली आहे. तरूणवर्गाची इतकी मोठी संख्या असलेले फारच थोडे देश जगात आहेत. जगातील बहुसंख्य देशांमधल्या नागरिकांचे सरासरी वयोमान वाढत चालले असून झपाट्याने मध्यमवयीन बनणाऱ्या या जगातला तरुणाईचा फार मोठा साठा आपल्याकडे आहे. ही फार महत्त्वाची जमेची बाजू आहे. या तरूणवर्गाला योग्य प्रशिक्षण दिले गेले की त्यांच्याकडून देशाच्या अर्थकारणात मोठे सकारात्मक बदल घडवून आणता येतीलच, शिवाय हे तरूण-तरूणी जागतिक पातळीवर काम करतील तेव्हा भरपूर पैसा कमावतील आणि त्यापैकी मोठा हिस्सा, बचतीच्या रूपाने, भारतात परत पाठवतील. यामुळे भारताचे सकल उत्पन्न म्हणजेच जीडीपी तसेच उत्पादकताही वाढेल आणि इथल्या तरूणवर्गाच्या निर्मितिक्षम मनाला संधीही उपलब्ध होतील. आज भारतात दिसणाऱ्या परिवर्तनांमध्ये आणि घडामोडींमध्ये या मानवी भांडवलाचा फार मोठा हिस्सा तर आहेच, परंतु महत्त्वाचे म्हणजे गेल्या काही वर्षांमधील एकंदर अस्थिर स्थितीमधून पुन्हा जोमाने वर येण्यासाठी देशाला या जोमदार, चळवळ्या लोकांचाच उपयोग होणार आहे. माहिती तंत्रज्ञान, दूरसंचार, जैवतंत्रज्ञान, आरोग्य... संपूर्णपणे कात टाकलेल्या किंवा नव्याने वर आलेल्या या क्षेत्रांकडे नजर टाका, म्हणजे आपल्याला नक्कीच फरक जाणवेल.

आज प्रस्थापित उद्योगक्षेत्रांमध्येही नवे धडाडीचे उद्योजक येऊन अभूतपूर्व यश मिळवत आहेत. मुख्य म्हणजे आजच्या या उद्योजकांना जागतिकीकरण, स्पर्धा इत्यादींची भीती वाटत नाही. उलट, पूर्वजांच्या सुरक्षित कोशांमधून आणि बंद किल्ल्यांमधून बाहेर पडून ते आज जगातल्या विविध कंपन्या धडाक्याने विकत घेत आहेत किंवा त्यांच्याशी आर्थिक-तांत्रिक सहकार्य करून आत्मविश्‍वास आणि दूरदृष्टीने गुंतवणूक करत आहेत. आज येथील आयटी उद्योगाच्या विस्तारामुळे भारताला आशियातील सिलिकॉन व्हॅली मानले जाते ते उगीच नाही. यानंतर आपल्याकडे बायोटेक्नॉलॉजी, मेडिकल सायन्स तसेच तंत्रज्ञानाच्या इतर बाबींमध्ये नवीन ज्ञान आणि उद्योगशाखांचे विस्तारीकरण सुरू होईल. यामुळे भारताची आंतरराष्ट्रीय पातळीवरील स्पर्धात्मक क्षमता वाढेल आणि शिकलेल्या तरुण पिढीला रोजगाराची मोठी संधी निर्माण होईल. दर्जेदार व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या संस्थांचे प्रमाण वाढल्यास आणि सरकारी पातळीवरही पुरेसे प्रयत्न आणि वचनबद्धता दिसली तर २०३० पर्यंत सर्वांना रोजगार मिळणेही शक्य होईल. अर्थात या फार मोठ्या संधीचा फायदा मिळवण्यासाठी आपणा सर्वांनाच मनोवृत्ती आणि कामाची पद्धत बदलावी लागेल. तसे न झाल्यास धोरणांच्या अंमलबजावणीतल्या सुस्त आणि संथपणामुळे लोकसंख्या हे देशापुढचे फार मोठे संकट राहील.

आपल्याला सर्वप्रथम शिक्षणाबाबतची, विशेषतः उच्च शिक्षणाबद्दलची पारंपारिक विचारपद्धती टाकून देऊन शिक्षणाला मुक्त करावे लागेल. बदलत्या काळानुसार शिक्षणपद्धतीही लवचिक आणि बदलत्या गरजा वेगाने सामावून घेणारी असायला हवी. जागतिकीकरणाचे फायदे हवे असतील तर आपल्या मुलामुलींना जागतिक पातळीवर वापरल्या जाणाऱ्या भाषा शिकवण्याचे काम युद्धपातळीवर हाती घ्यावे लागेल. जागतिक पातळीवरील रोजगारांची चाहूल लागली की आपल्याकडील युवकवर्ग इंग्लिश, स्पॅनिश, फ्रेंच, जपानी यासारख्या भाषा शिकायला फक्त तयार होतील असे नव्हे, तर उत्सुक बनतील. यासाठी प्रचंड प्रमाणावर शिक्षक लागतील हे खरे आहे परंतु नेमक्या याच ठिकाणी आपण इ-शिक्षण, आभासी शाळा (व्हर्च्युअल क्लासरूम) अशा बाबींचा वापर करू शकतो. माहिती तंत्रज्ञान सक्षमित शिक्षणपद्धतीचा आपल्याला मोठा उपयोग होणार आहे. इथे केरळचे उदाहरण देता येईल. जवळजवळ प्रत्येक कुटुंबातली एक व्यक्ती परदेशी चलन कमावत असल्याने केरळचा चेहरामोहरा बदलला आहे. महाराष्ट्रात हे घडवणे अजिबात अशक्य नाही, परंतु एकीकडे शेतीवर अवलंबून राहणे कमी करा असे तरूणांना सांगताना रोजगाराचा त्याहून चांगला पर्याय देणे आवश्यक आहे. जपान ही जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था असून एक वृद्ध देश आहे. या देशाचे सरासरी आयुर्मान सुमारे ८० पेक्षा अधिक आहे. फक्त भाषेचा अभ्यास व जपानी चालीरितींचा सराव याच्या जोरावर कुठलाही भारतीय जपानमध्ये करिअर करू शकतो .

शिक्षण म्हणजे शाळा-कॉलेज, घोकंपट्टी आणि अखेर पदवी हे आपल्या मनावर आत्तापर्यंत कोरलेले चित्र पुसण्याची आणखी एक पायरी आपल्याला येत्या काळाम ध्ये ओलांडावी लागेल. शिक्षणाचे मोठ्या प्रमाणात संगणकीकरण झाल्यास शिक्षणाच्या किंवा शिक्षकाच्या दर्जाबाबतची मोठी चिंता तर मिटेलच, शिवाय शिक्षण देण्या-घेण्याच्या वेगामध्येही बदल होतील. शालेय शिक्षणाची आज आपण बारा वर्षे मानतो, परंतु तेवढेच शिक्षण नवीन तंत्राने आठ वर्षांमध्ये देता येईल. आता संगणकीकृत दूरशिक्षणाला मोठी मागणी येत असून या मार्गाने देशभरातल्या दूरदूरच्या हजारो विद्यार्थ्यांना, वाजवी किंमतीत, उच्च शिक्षणाकडे वळणे शक्य येईल. शिकलेल्या लोकांचे आणि रोजगारांचे प्रमाण वाढले आणि त्यातून सर्वांना पैसा मिळू लागला की भारतातल्या एकंदर सामाजिक वातावरणात फरक पडेल, शांतता नांदेल आणि एकी वाढेल. देशातील सर्वच लोकांच्या हाती पुरेसा पैसा खेळू लागला की ते बाहेरील फुटीरतावादी शक्तींना बळी पडणार नाहीत. देशात येऊ घातलेल्या या परिवर्तनाची दिशा समजून घेऊन पालकांनी मुलामुलींना शिक्षण देण्याबाबतच्या स्वतःच्या दृष्टिकोनात योग्य ते बदल करायला हवेत. त्यांना पुस्तकातले किडे न बनवता हरहुन्नरी होऊन जगात आत्मविश्‍वासाने वावरण्यासाठी लागणारी सर्व कौशल्ये आत्मसात करू द्यायला हवीत.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

# मंत्री विखेंच्या हस्ते आंबरे डेंटल केअरचा शुभारंभ

## पालकमंत्री विखे पाटील यांनी आंबरे परिवाराचे कौतुक करून दिल्या शुभेच्छा

**जनता आवाज वृत्तसेवा**



**कोल्हार** : अक्षय तृतीयेच्या शुभमुहूर्तावर कोल्हार येथील शांत सुसंस्कृत कुटुंबातील प्रा जनार्दन आंबरे यांच्या उच्चशिक्षित सुनबाई डॉ. गायत्री आंबरे यांच्या आंबरे डेंटल केअरचा कोल्हार भगवतीपुरमधील सोनगाव रोड येथील जिल्हा परिषद शॉपिंग कॉम्प्लेक्समध्ये दि. ६ एप्रिल २०२५ रोजी महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते मोठ्या दिमाखात शुभारंभ झाला.

यावेळी डॉ. गायत्री आंबरे यांचे ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी कौतुक करून त्यांना त्यांच्या भावी वाटचालीस शुभेच्छारुपी आशीर्वाद दिले.

याप्रसंगी आंबरे परिवारातर्फे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील व डॉ. भास्कर खर्डे पाटील यांचा ऋषिकेश आंबरे यांनी शाल, श्रीफळ तसेच स्मृतिचिन्ह देऊन सत्कार केला. यावेळी प्रसिद्ध वास्तुशास्त्र तज्ञ डॉ. आनंद पिंपळकर, आनंदी वास्तू विमान नगर पुणे हे उपस्थित होते.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रवरा सहकारी बँकेचे अध्यक्ष डॉ. भास्करराव खर्डे पाटील होते. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून भगवती माता देवालय ट्रस्टचे अध्यक्ष भाऊसाहेब खर्डे, प्रेरणा उद्योग समूहाचे संस्थापक अध्यक्ष सुरेशराव वाबळे, कृषिभूषण उद्योजक राजेंद्र शेठ कुंकलोळ, राहुरी नगरपालिकेचे नगरसेवक रावसाहेब तनपुरे, पद्मश्री विखे कारखान्याचे नवनिर्वाचित संचालक श्रीकांत खर्डे, ज्ञानेश्‍वर खर्डे, स्वप्निल निबे, धनंजय दळे, साईनाथ खर्डे, पंढरीनाथ खर्डे, पशु मत्स्य विद्यापीठ नागपूरचे कार्यकारणी सदस्य ऋषिकेश खांदे, भगवतीपुर ग्रामपंचायतचे सरपंच दत्तात्रय राजभोज, उपसरपंच प्रकाश खर्डे, भगवती माता देवालय ट्रस्टचे विश्‍वस्त अजित मोरे, वसंत खर्डे, अक्षय मोरे, गणेश गागरे, आसिर पठाण, सुनील बोरुडे, आंबरे पाटील आप्तेष्ट, मित्र परिवार तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम ादरम्यान आंबरे परिवाराकडून आलेल्या सर्वांना अल्पोहाराचे वाटप करण्यात आले.

# सराव व योग्य मार्गदर्शन मिळाल्यास स्पर्धा परीक्षेत यश : डॉ. खिलारी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : सातत्य, सराव व योग्य मार्गदर्शन मिळाल्यास ग्रामीण भागातील विद्यार्थी देखील स्पर्धा परीक्षामध्ये मोठे यश मिळवू शकतो, असे प्रतिपादन शालेय समिती सदस्य डॉ. भाऊसाहेब खिलारी यांनी केले. पारनेर येथील न्यू इंग्लिश स्कूल विद्यालयात गुणवत्ता सुधार प्रकल्पाचा उद्घाटन समारंभ संपन्न झाला. मागील दोन वर्षापासून हा उपक्रम सुरू आहे. या कार्यक्रम ासाठी प्रमुख पाहुणे म्हणून आबासाहेब गरवारे, महाविद्यालयाचे भौतिकशास्त्र विषयाचे तज्ज्ञ मार्गदर्शक गोविंद कुलकर्णी व संदीप नवले उपस्थित होते.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानावरून नगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल व शालेय समिती सदस्य डॉ. भाऊसाहेब खिलारी यांनी आपल्या शालेय जीवनातील अनुभव विषद करत मार्गदर्शन केले. सातत्य, सराव व योग्य मार्गदर्शन मिळाल्यास ग्रामीण भागातील विद्यार्थी देखील स्पर्धा परीक्षाम ध्ये मोठे यश मिळवू शकतो, असा आशावाद व्यक्त केला. इयत्ता १२ वीच्या परीक्षेची तयारी सुरुवाती पासुन केल्यास मोठे यश नक्की मिळते असे सांगितले. जे विद्यार्थी सीईटी, नीट, जेईई या परीक्षांचे मार्गदर्शन मिळवण्यासाठी पुणे, लातूर, कोटा आणि इतरत्र जातात. या विद्यार्थ्यांना आपल्या पारनेरमध्येच ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. त्यामुळे या सुवर्णसंधीचा पालक व विद्यार्थ्यांनी अवश्य लाभ घ्यावा व आपली शैक्षणिक गुणवत्ता वाढवत उत्तम डॉक्टर्स, इंजिनियर्स तयार व्हावेत, अशी अपेक्षाही व्यक्त केली. प्रास्ताविक प्रवीण कुटे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय संदीप लंके यांनी करून दिला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष ठाणगे यांनी केले व आभार सचिन दुसुंगे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी गुणवत्ता सुधार प्रकल्प प्रमुख सतीश फापाळे, बापू होळकर, प्रवीण कुटे, अजित दिवटे, विजय दळवी, सागर लोंढे, राहुल नवले, विशाल सोबले, अमोल बारवकर, अमोल रोहोकले, बापू रोहोकले, गौरव तडके, आकाश भोपळे, पठारे, राजे यांनी प्रयत्न केले.

पान १ वरून | पान १ वरून | पान १ वरून

## विझिंजम बंदर मैलाचा दगड

महामार्ग प्रकल्पांची पायाभरणी करतील. पंतप्रधान मोदी ११२४० कोटी रुपये खर्चून बांधल्या जाणाऱ्या ५२०० घरे, विधानसभा, उच्च न्यायालय, सचिवालय आणि इतर प्रशासकीय इमारतींची पायाभरणी करतील. लँड पूलिंग स्कीम पायाभूत सुविधा प्रकल्पात अमरावतीमध्ये २०,४०० कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चाचे १,२८१ किमी रस्ते समाविष्ट असतील. ज्यामध्ये सेंट्रल मीडियन, सायकल ट्रॅक सारख्या सुविधा असतील. यासाठी २९ गावांमधील शेतकऱ्यांकडून ३८८५१ एकर जमीन ताब्यात घेण्यात आली आहे. या शेतकऱ्यांनाही कार्यक्रमासाठी आमंत्रित करण्यात आले आहे.

## प्रवरेच्या वाटचालीत कामगारांचे योगदान

खाजगीकरण होऊ नये सहकार टिकला पाहिजे. यासाठी लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील हे कायमच आग्रही होते आणि हेच काम मंत्री विखे पाटील करत आहेत. यामुळे आज विखे पाटील कारखाना हा सक्षमपणे उभा आहे. प्रवरा हे कुटुंब एकत्र आहे. सेवानिवृत्तीनंतर आपले जीवन सुखकर व्हावेत, यासाठी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांसाठी विखे पाटील फाउंडेशनचे डॉ. विखे पाटील हॉस्पिटल विळद आणि विमा कंपनीच्या माध्यमातून आपल्या आरोग्याची ही घेतली जाईल, असेही असेही डॉ. विखे पाटील यांनी सांगितले.

## शांतता भंग करणाऱ्यांवर कारवाई होणार

घेण्यात आली. या सभेत ते बोलत होते. शिर्डी पोलिस स्टेशनचे पोलिस उपाधीक्षक वमने, कोपरगांव ग्रामीण पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक संदीप कोळी, पोलिस उपनिरीक्षक पवार, ठाणे अंमलदार तमनर, सरपंच सुलोचना ढेपले, उपसरपंच विवेक परजणे यांची प्रमुख उपस्थितीत होती. माजी सरपंच चंद्रशेखर देशमुख, अ‍ॅड. लोहकणे, मधुकर साबळे, राजेंद्र लोखंडे, अशोकराव थोरात यांचीही यावेळी भाषणे झाली. सभेला पोलीस पाटील लीनाताई आचारी, चंद्रकांत लोखंडे, दिलीपराव ढेपले, शिवाजीराव गायकवाड, लक्ष्मणराव साबळे, सोमनाथ निरगुडे, तलाठी वाडेकर, कृषी अधिकारी श्रीमती कांबळे मॅडम, विद्युत वितरणचे अधिकारी बोंडखळ, तुषार बाराहाते, ज्ञानदेव कासार, अनिल आचारी, मधुकर साबळे, सुभाष लोखंडे, ज्ञानदेव पावडे, संभाजीराव भोसले, अविनाश गायकवाड, बाळासाहेब गायकवाड, संजय भाकरे, बाबुराव मैद, बापू तिरमखे, ग्रामविकास अधिकारी कृष्णकांत आहिरे, लक्ष्मणराव परजणे यांनी आभार मानले.

## देश दुष्काळमुक्त होण्यासाठी शासन कटिबद्ध

मात्र संपूर्ण जगाच्या केवळ चार टक्के पाणी भारतात आहे. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची संकल्पना असलेल्या नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून संपूर्ण देश दुष्काळमुक्त करण्याचा संकल्प आहे. उपलब्ध पाण्यात शेतीला सिंचन झाले पाहिजे, यासाठी जलसंपदा विभागाचा प्रयत्न आहे. नदीजोड प्रकल्प पूर्ण करण्याचे स्वप्न पद्मश्री बाळासाहेब विखे पाटील यांचे होते, ते स्वप्न माझ्या हातून होत आहे. ही माझ्यासाठी भाग्याची गोष्ट आहे. गोदावरी उजवा व डावा अशा दोन्ही कालव्यांचे काम पूर्ण करण्यात येईल. काल भूमिपूजन करण्यात आलेल्या कालव्याचे डिसेंबर २०२६ पर्यंत काम पूर्ण करण्यात येईल.

## जातिनिहाय जनगणना ऐतिहासिक निर्णय

जातींमध्ये भेदभाव वाढला, आणि अनेक प्रश्‍न प्रलंबित राहिले मात्र आता केंद्रातील मोदी सरकारच्या नेतृत्वाखाली जातिनिहाय जनगणना होईल आणि त्याद्वारे आरक्षणासह अनेक मुद्द्यांना न्याय मिळेल. तसेच सामाजिक परिस्थितीची नोंद होऊन जाती आणि लोकसंख्येची, शैक्षणिक पातळीची, आर्थिक स्थितीची आणि प्रशासनातील सहभागाची माहिती मिळवणे सोयीस्कर होईल. जातीनिहाय जनगणनेमुळे लोक संख्येनुसार योग्य प्रतिनिधित्व मिळवि ण्यासाठी बळ मिळेल, आणि विविध जातींच्या राजकीय आणि सामाजिक मागण्यांना आधार मिळेल.

## जिवंत बॉम्ब लष्कराकडून निकामी

दृष्टीने आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे यावेळी मान्य करण्यात आले होते. १ मे रोजी लष्करी तज्ञांच्या पथकाने हा जिवंत बॉम्ब सुरक्षितपणे काढून तो आपल्या ताब्यात घेतला. हा बॉम्ब निकामी असल्याची माहीती स्टेशन कमांडर यांनी खा. लंके यांना दिली. हा बॉम्ब निकामी करण्यात आल्याने परिसरातील शेतकऱ्यांना तसेच नागरीकांना मोठा दिलासा मिळाला असून एक संभाव्य आपत्ती टळली आहे. या घटनेनंतर लष्करी हददीतील समस्या, शैक्षणिक गरजा आणि मंदीर विकास आदी प्रश्‍नांवरही लवकरच तोडगा निघेल, अशी अपेक्षा आहे.

## ... खते खिशात घेवून शेती करता येणार : कोल्हे

आहे. नॅनो खताप्रमाणे कृषी क्षेत्रात नाविन्यता आणण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर ऊस शेतीमध्ये होतो आहे. प्रदूषणाने खतांचा परिणाम तितकासा पिकांवर होत नाही मात्र नॅनो खतांमुळे नव्वद टक्केपेक्षा जास्त फायदा थेट पिकांना मिळतो. यामुळे पाणी आणि मृदा प्रदूषण होत नाही असेही शेवटी कोल्हे म्हणाले. या कार्यक्रमासाठी सुभाष काटकर, शिवाजी आमले, संजय शेवाळे, यु. आर. तिजारे, डॉ. एम. एस. पोवार आदी मान्यवरांचे मार्गदर्शन लाभले. याप्रसंगी दिपक मालपुरे, सुधाकर पवार, बाळासाहेब खेडकर, शारदा कापसे, रमेशचंद्र घुगे, संपतराव डुंबरे, सचिन गिते, अनिल कुंदे, निफाड, बापू मोरे, रामभाऊ माळोदे, निमिष पवार, नितीन उमराणी यांसह आदींची उपस्थिती लाभली.

हे दैनिक जनता आवाज मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक अजित रमेश मोरे यांनी जनता आवाज प्रेस गट नं. २५/१/२/३, कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर ४१३७१० येथे छापून दैनिक 'जनता आवाज', मु.पो. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर, ४१३७१० जिल्हा कार्यालय- गाळा नं.१, विवेकानंद पॅलेस, श्रीराम चौक, बोल्हेगाव, अहिल्यानगर ४१४१११. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. विभागीय कार्यालय- जिजामाता चौक, सोमैय्या हायस्कूल शेजारी, व्यापारी संकुल बिल्डींग, दुसरा मजला, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, ४१३ ७०९, * कार्य. संपादक : महेश पोपट रक्ताटे. पोस्टल परवाना क्र. SRP/141/2025-2028/ PRGI No. MHMAR/25/RAA11.
This daily Janta Awaj is published by Ajit Ramesh More, owner, printer, publisher and editor at Janta Awaj Press Gut No. 25/1/2/3, Kolhar Bk., Tal.- Rahata, Dist.- Ahilyanagar-413710. Published at District Office- Shop No.1, Vivekanand Palace, Shriram Chowk, Bolhegaon, Ahilyanagar-414111. Divisional Office-Jijamata Chowk, Near Somaiyya High School, Business Complex Building, 2nd Floor, Tal.-Shrirampur, Dist. -Ahilyanagar-413709
* Executive Editor- Mahesh Popat Raktate. Postal License Number-SRP/141/2025-2028 PRGI No.- MHMAR/25/RAA11

## आ. काळेंचा सोमवारी जनता दरबार

**जनता आवाज वृत्तसेवा**



**कोळपेवाडी** : कोपरगाव विधानसभा मतदारसंघाच्या विकासाचे प्रश्न सोडविण्यात आघाडीवर असणारे आ. आशुतोष काळे नागरीकांचे शासकीय कार्यालातील प्रश्न व अडचणी सोडविण्यात देखील आघाडीवर आ-हेत. यासाठी त्यांनी जनता दरबार हा उपक्रम मागील सहा वर्षापासून अविरतपणे राबविला आहे. सोमवार (दि.५) रोजी दुपारी २ वाजता कोपरगाव शहरातील नागरिकांच्या कोपरगाव नगरपालिकेच्या संदर्भातील समस्या व अडचणी सोडविण्यासाठी तहसील कार्यालयात 'जनता दरबार' आयोजित करण्यात आला असल्याची माहिती आ. आशुतोष काळे यांच्या जनसंपर्क कार्यालयाच्या वतीने देण्यात आली आहे.या जनता दरबारात नगरपालिका क्षेत्रातील कोपरगाव शहरातील नागरिकांनी कोपरगाव नगरपालिकेच्या संदर्भातील आपल्या समस्या व अडचणी लेखी स्वरूपता मांडाव्यात असे आवाहन आ.आशुतोष काळे यांच्या जनसंपर्क कार्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

# कोल्हार भगवतीपुरमध्ये विशेष ग्रामसभा

### दि. ५ मेच्या ग्रामसभेत होणार महिलांच्या सुरक्षिततेवर चर्चा; डॉ. सुजय विखे उपस्थित राहणार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोल्हार** : कोल्हार भगवतीपुरमध्ये महिला आणि मुलींच्या सुरक्षितेच्या प्रश्नाने उग्ररूप धारण केले आहे. सर्वत्र चिंतेचा बनलेला हा विषय घरा-घरात भेडसावू लागला आहे. या गंभीर प्रश्नावर तसेच ऐनवेळी येणाऱ्या विषयांवर विचारविनिमय करून प्रतिबंधात्मक निर्णय घेण्यासाठी कोल्हार बुद्रुक आणि भगवतीपुर ग्रामपंचायतीच्या वतीने सोमवार, दि. ५ मे रोजी सायंकाळी ६:३० वा. भगवती माता मंदिराच्या भव्य प्रांगणात संयुक्त ग्रामसभा आयोजन करण्यात येत आहे.

डॉ. सुजय विखे पाटील व प्रशासकीय अधिकारी या सभेला उपस्थित राहणार आहेत. दोन्ही गावातील प्रत्येक घरातील एक व्यक्ती विशेषता महिलांनी उपस्थित रहावे, यासाठी नियोजन करण्यासाठी तसेच 'निर्धार स्त्री संरक्षणाचा संकल्प आमच्या गावाचा' असा निर्धार व्यक्त करीत सोमवारी रात्री भगवती मंदिरात विशेष बैठक पार पडली.

याप्रसंगी प्रवरा सहकारी बँकेचे अध्यक्ष डॉ. भास्कर खर्डे, कोल्हार बुद्रुकचे मा. सरपंच ॲड. सुरेंद्र खर्डे, भगवती माता देवालय ट्रस्टचे अध्यक्ष सयाजी खर्डे, देवालय ट्रस्टचे उपाध्यक्ष साहेबराव दळे, पद्मश्री विखे कारखान्याचे नवनिर्वाचित संचालक ज्ञानेश्वर खर्डे, श्रीकांत खर्डे बापूसाहेब कडसकर, कोल्हार बुद्रुकचे माजी उपसरपंच स्वप्निल निबे, भगवतीपुर ग्रामपंचायतचे सरपंच दत्तात्रय राजभोज, उपसरपंच प्रकाश खर्डे, देवालय ट्रस्टचे विश्वस्त संभाजी देवकर, अजित मोरे, वसंत खर्डे, धनंजय दळे, इलियास शेख तसेच सर्व जाती-धर्माचे सर्वस्तराचे ग्रामस्थ उपस्थित होते.



यावेळी सुरेंद्र खर्डे म्हणाले की, शाळेतील अथवा महाविद्यालयातील मुलींच्या छेडछाडीचे प्रकार वाढले आहेत. टुकार मुलांचा बंदोबस्त झाला पाहिजे, असा गावातील ग्रामस्थांचा सूर आहे. सद्यस्थितीत गुंडांची व पोलिसांची मैत्री असल्याचे दिसून येते. या पार्श्वभूमीवर जात-पात गट तट विसरून कोल्हार आणि भगवतीपुर या दोन्ही गावांची संयुक्त ग्राम सभा घेण्याचे ठरले आहे.

यावेळी स्वप्निल निबे म्हणाले की, दोन्ही गावचे भविष्यातील यासाठी ही नियोजित होणार आहे. सध्या गावातील गुंडांना कोणाचाही धाक राहिला नाही घराच्या महिलांपर्यंत हा विषय आला आहे. आम्ही काल वेगवेगळ्या समाजाच्या बैठका घेतल्या. अनेक जण घराला कुलूप लावून या ग्रामसभेला उपस्थित राहणार आहेत.

व्यापारी पतसंस्थेचे अध्यक्ष संजय शिंगवी म्हणाले की, गावातील वाढत्या गुंडगिरी व दादागिरीमुळे काही लोक गाव सोडून निघून गेले. कोणीही कुठेही दादागिरी करू लागल्या मुळे त्याचा व्यवसायांवर विपरीत परिणाम होऊ लागला.

यावेळी डॉ. भास्कर खर्डे, श्रीकांत खर्डे, मयूर कडसकर, आसिफ शेख, दत्तात्रय राऊत, लवलेश लोखंडे, संदीप खर्डे, सुनील बोरुडे यांनी यावेळी सूचना मांडल्या.

## सरकारच्या माध्यमातून महाराष्ट्र प्रगतीकडे

### आ. खताळ; महाराष्ट्र दिनानिमित्त आ. खताळ यांच्या हस्ते ध्वजारोहण



**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : महाराष्ट्र ही साधू संतांची आणि महतांची भूमी आहे. त्यांच्या ताकदीमुळेच खऱ्या अर्थाने महाराष्ट्राची देशात एक आगळी वेगळी ओळख निर्माण झाली आहे. महा युती सरकारच्या माध्यमातून महाराष्ट्र कधीच थांबणार नाही. तर कायमच प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत राहील, असा विश्वास आ अमोल खताळ यांनी व्यक्त केला.

संगमनेर शहरातील नगरपालिकेच्या क्रीडा संकुलनामध्ये म हाराष्ट्र दिनाच्यानिमित्ताने आमदार अम ोल खताळ यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी संगमनेरचे प्रभारी प्रांताधिकारी विशाल यादव, तहसीलदार धीरज मांजरे, पोलीस उपाधीक्षक डॉ. कुणाल सोनवणे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता श्रीनिवास वर्पे, उपविभागीय कृषीअधिकारी विलास गायकवाड, प्रांत आधिकारी कार्यालय नायब तहसीलदार श्रीकांत लोमटे, निवासी नायब तहसीलदार सुभाष कदम, पोलीस निरीक्षक रवींद्र देशम ुख, देविदास ढुमणे आदी मान्यवर उपस्थित होते.

आ. खताळ म्हणाले की, म हाराष्ट्र गीतातून प्रत्येकाच्या अंगावर अक्षरशः शहारे उमटतील एवढी ताकद महाराष्ट्रा तील साधुसंतांनी निर्माण केलेली आहे. महायुतीसरकारच्या माध्यमातून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अजित पवार हे चांगले निर्णय घेत आहे.त्यामुळे महाराष्ट्र कधी थांबणार नाही तो कायमच प्रगतीच्या दिशेनेच वाटचाल करत राहील.

## आरवी फटांगडे विद्यालयात प्रथम

**जनता आवाज वृत्तसेवा**



**बालमटाकळी** : शेवगाव तालुक्यातील बालमटाकळी येथील श्री भगवान माध्यमिक व उच्च माध्यमिक या विद्यालयात इयत्ता नववीच्या वर्गात सेमी इंग्लिश माध्यममध्ये शिकणारी आरवी दिगंबर फटांगडे या विद्यार्थिनीने नुकताच नववीच्या वर्गातील वार्षिक परीक्षेच्या लागलेल्या निकालामध्ये ८७.३३ टक्के गुण प्राप्त करून विद्यालयात प्रथम क्रमांक येण्याचा बहुमान पटकावला आहे. तिच्या या यशामागे तिचे आजोबा तथा बालमटाकळी ग्रामपंचायत कार्यालयाचे पाणीपुरवठा विभागाचे कर्मचारी एकनाथ शिंदे, वर्गशिक्षक आंधळे, डॉ. मयूर शिंदे यांच्या लाभलेल्या विशेष मार्गदर्शनाने सदर यश लाभले असल्याचे आरवी फटांगडे यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले आहे. तिने मिळवलेल्या या यशाबद्दल तिचे सर्वच स्तरावरून कौतुक होत आहे.

## 'गाव व वस्ती संपर्क' अभियान संपन्न

**जनता आवाज वृत्तसेवा**



**आश्वी** : गाव व वस्ती संपर्क अभियाना अंतर्गत गा-वातील तसेच वस्तीवरील मंदीरे, रूग्णालय तसेच शाळा परीसर स्वच्छता करणे, केंद्र सरकार तसेच महाराष्ट्र सरकार मार्फत चालवत आलेल्या विविध शासकीय योजनांमधील किमान १० लभार्थायांशी संपर्क व संवाद साधने. तसेच आंगणवाडी शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामपंचाय तसेच अन्य शासकीय कार्यलयास भेटी देत तेथील समस्या जाणून घेत त्या समस्या शासन दरबारी मांडून त्या तत्काळ सोडवण्यासाठी पुढाकार घेण्यात येणार असल्याची माहिती पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन कैलास तांबे यांनी सांगितली.

आश्वी बुद्रुक (ता.संगमनेर) येथे नुकताच गाव व वस्ती संपर्क अभियाना अंतर्गत पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन कैलास तांबे यांच्या मार्गदर्शना खाली बैठक संपन्न झाली. यावेळी माहिती पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्याचे संचालक सिजयराव म्हसे, प्रवरा बँकेचे संचालक माधवराव गायकवाड, अजय ब्राम्हणे, संजय गांधी, प्रवरा शिक्षण संस्थेचे संचलाक भाऊसाहेब जऱ्हाड, प्रवरा बँकेचे माजी चेअरमन अशोकराव म्हसे, कारभारी म्हसे, अनिल म्हसे, नारायण म्हसे, सुभाष होडगर, संदिप चतुरे, ओबीसी सेल शिर्डी प्रमुख वैभव ताजणे उपस्थित होते.

## नेवासा येथे राष्ट्रीय ध्वज तिरंग्यास सलामी



**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा** : नेवासा येथे महाराष्ट्र स्थापना दिनाच्या निमित्ताने शासकीय व निमशासकीय कार्यालयासह विविध शाळेमध्ये ध्वजार-ोहणाद्वारे राष्ट्रीय ध्वज तिरंग्यास सलामी देऊन महाराष्ट्र दिन व राष्ट्रीय कामगार दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

नेवासा तालुक्याच्या वतीने मुख्य ध्वजारोहण नेवासा तहसील कचेरीच्या प्रांगणात झाला.नेवासा तालुक्याचे आमदार विठ्ठलराव लंघे पाटील यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून ध्वज पूजन करण्यात येऊन ध्वजारोहण करण्यात आले. पोलीस उपनिरीक्षक विजय भोंबे यांनी पथसंचलन करून सलामी दिली. यावेळी तहसीलदार डॉ. संजय बिरादार, गटविकास अधिकारी संजय लखवाल, निवासी नायब तह-सीलदार चांगदेव बोरुडे, नायब तहसीलदार किशोर सानप, तालुका कृषी अधिकारी धनंजय हिरवे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता सुरेश दुबाले, मंडल अधिकारी अनिल गव्हाणे, नगरपंचायतचे कार्यालयीन अधिक्षक मेजर रामदास म्हस्के,तलाठी धनंजय परदेशी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

नेवासा पंचायत समितीमध्ये गटविकास अधिकारी संजय लखवाल तर नगर पंचायतमध्ये प्रशासक तहसीलदार डॉ. संजय बिरादार, होम गार्ड समादेशक कार्यालयात डॉ. करणसिंह घुले,तलाठी कार्यालयात मंडलाधिकारी अनिल गव्हाणे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. नेवासा शहरासह तालुक्यातील शाळांमध्ये ही ध्वजारोहण करून विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी झालेल्या ध्वजारोहण कार्यक्रम प्रसंगी जेष्ठ कार्यकर्ते गफूरभाई बागवान, इसाकभाई मणियार, डॉ.करणसिंह घुले, मनोज पारखे, शोभाताई आलवणे, विमा विकास अधिकारी किशोर गारुळे, अजितसिंह नरुला, अशोक ताके,मोहन खराडकर आदी उपस्थित होते.

## रोहिणी घुले कर्जत नगरपंचायतच्या नव्या नगराध्यक्षा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत** : कर्जत नगरपंचायतच्या नगराध्यक्षपदी रोहिणी घुले यांची अधिकृत निवड जाहीर झाली आहे. नागरी प्रश्नांना आणि समस्यांना सोडवण्यासाठी राम शिंदे यांच्या नेतृत्वाखाली प्राधान्य देणार असे रोहिणी घुले यांनी यावेळी जाहीर केले.

संपूर्ण राज्याचे लक्ष लागलेल्या कर्जत नगरपंचायत च्या नगराध्यक्षपदी रोहिणी घुले यांची काल बिनविरोध निवड झाल्याची प्राप्तधिकारी नितीन पाटील यांनी अधिकृत घोषणा केली. यावेळी मुख्याधिकारी अक्षय जायभाय, गटनेते संतोष मेहत्रे, सचिन घुले, महेश तनपुरे, विनोद दळवी व सर्व नगरसेवक उपस्थित होते.कर्जत नगरपंचायतच्या नगराध्यक्ष पदाच्या निवडीची दोन मे रोजी अधिकृत तारीख जाहीर करण्यात आले होते. २८ तारखेला उमेदवारी अर्ज भरण्यात आली होती. यावेळी रोहिणी सचिन घुले या काँग्रेस पक्षाचे असून त्यांनी महायुतीकडून उमेदवारी अर्ज राम शिंदे यांच्या नेतृत्वाखाली दाखल केला होता. तर प्रतिभा नंदकिशोर भैलूमे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष रोहित पवार यांच्या नेतृत्वाखाली उमेदवारी अर्ज दाखल केला होता. श्रीमती भैलूमे यांनी उमेदवारी अर्ज म ागे घेतला. त्यामुळे रोहिणी घुले यांचा एकमेव अर्ज शिल्लक राहिल्यामुळे त्या नगराध्यक्ष होणार हे आता निश्चित झाले होते त्याची घोषणा काल विशेष सभेमध्ये करण्यात आली.



### उपनगराध्यक्ष निवडीकडे सर्वांचे लक्ष

कर्जत नगरपंचायत च्या उपनगराध्यक्ष निवडीकडे आता सर्वांचे लक्ष ला-गले आहे, मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने जिल्हाधिकारी यांचा अमृत काळदाते यांच्या गटनेते पदाच्या निवडीच्या अर्जावर दिलेला निकाल स्थगित केला. तीन आठवडे यांच्या मदतीच्या आत जिल्हाधिकाऱ्यांनी यावर पुन्हा निर्णय द्यावा असे कळविले आहे. यामुळे आता जिल्हाधिकारी काय निर्णय घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## विद्यार्थ्यांना बक्षीसांचे वाटप

**जनता आवाज वृत्तसेवा**

**साकुरी** : साकुरी येथील प्रगतशील शेतकरी कैलसवासी श्री एकनाथ लक्ष्मण दंडवते यांच्या स्मृति जपण्यासाठी त्यांचे चिरंजीव रमेश एकनाथ दंडवते यांनी अनोखा उपक्रम राबवला आहे. आपल्या वडिलांची आठवण सदैव राहावी म्हणून दंडवते यांनी साकुरी येथील जिल्हा परिषद शाळेतील वार्षिक परीक्षेत इयत्ता पहिली ते सातवी या वर्गातील प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्याला आपल्या वडिलांच्या स्मृतिनिमित रुपये अकराशे इतकी रक्कम सर्व सात वर्गातील प्रत्येक विद्यार्थ्याला बक्षीस म्हणून दिली आहे. येथून पुढेही दरवर्षी शाळेत प्रथम क्रमांक येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थी यांना बक्षीस देणार असल्याचे रमेश दंडवते यांनी सांगितले. यावेळी मुख्याध्यापक अरुण बनसोडे, बाबासाहेब बनसोडे, रमेश दंडवते, नीरज कदम, प्रसाद चोळके, जितेंद्र जाधव यासह सर्व विद्यार्थी व सर्व शिक्षक उपस्थित होते.

## भगवान ऋषभदेव इतिहास निर्माता होते

### प्रविणऋषीजी महाराज; चिचोंडीतील वर्षीतप पारणा महोत्सवाची सांगता

**जनता आवाज वृत्तसेवा**

**करंजी** : प्रथम तिर्थंकर भगवान ऋषभदेवांनी या देशाला सर्वप्रथम कुटुंब व्यवस्था, राज व्यवस्था, सम ाज व्यवस्था, शेती, व्यापार व धर्म व्यवस्था निर्माण करून आत्मनिर्भरता शिकवली. भगवान ऋषभदेव इतिहास निर्माता व युगप्रवर्तक होते. दुष्टांना शांततेची भाषा समजत नसेल तर प्रसंगी स्वसंरक्षणासाठी शस्त्रही हाती घ्यावे लागते ही प्रथम शिकवण देणारे भगवान ऋषभदेव असल्याचे प्रतिपादन उपाध्याय श्री प्रविणऋषीजी यांनी केले.



चिचोंडी येथील बाराव्या अक्षयतृतीया वर्षीतप पारणा महोत्स-वात बोलत होते.राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज यांची जन्मभूमी चिचोंडी येथे साकारत असलेल्या भव्य आनंद तीर्थावर यावर्षी उपाध्याय प्रवीण ऋषीजी यांच्या प्रेरणेने अखंडपणे बाराव्या वर्षी हा अक्षयतृतीया वर्षीतप पारणा महोत्सव आयोजित करण्यात आला होता. यावेळी ते भाविकांना उपदेश करताना बोलत होते. प्रविणऋषीजी महाराज म्हणाले की, क्षत्रिय गुण शिकवणारे भगवान ऋषभदेव होते. या देशाचा दैदिप्यम ान इतिहास व स्वाभिमान आपण विसरत चाललो आहोत. आपण आपल्या इतिहासाचा, आध्यात्माचा, परंपराचा, संस्कृतीचा गर्व बाळगायला हवा. अक्षय तृतीयेच्या दिवसाला मोठे अध्यात्मिक महत्त्व आहे. याच दिवशी राजा श्रेयांसकुमार यांच्या इक्षुरसाने (उसाच्या रसाने) भगवान ऋषभदेवांच्या तेरा महिन्याच्या कठोर तपाची सांगता झाली. ही महान परंपरा आजही वर्षीतप करणारे तपस्वी पुढे चालवत आहेत.यावेळी व्यासपीठावर परमपूज्य मुकेशमुनिजी म.सा., म धुरगायक पूज्य हितेशमुनिजी जैन साध्-वी महासती कंचनकंवरजी, महासत-ीजी सुनंदाजी, पूज्य आदर्शज्योतीजी, महासती सुप्रियदर्शनाजी, महासती ओजसदर्शनाजी आदी ४० जैन संत व साध्वीवृंद उपस्थित होते. आनंद तिर्थ परीवार, आनंद फाउंडेशन, आनंद भक्त परीवार, पंचक्रोशीतील भक्त परीवार, महीला मंडळ, अर्हम विज्जा ग्रुप यांनी विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमासाठी चेन्नई, बंगलोर, म्हैसूर, जयपूर, जोधपूर, हैदराबाद, रायपुर, पुना व महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातील भक्त परिवार उपस्थित होता.

# आ.काळेंच्या डावा कालवा दुरुस्तीच्या मागणीला ना. विखे पाटलांचा प्रतिसाद

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी** : गोदावरी उजव्या कालव्यावरील माती काम, बांधकाम व अस्तरीकरण करण्याचे काम जलसंपदा विभागाने हाती घेतले हि गोदावरी उजव्या कालव्याच्या लाभधारक क्षेत्राच्या शेती व शेतकऱ्यांच्या दृष्टीने अतिशय समाधानकारक व दिलासा देणारी बाब आहे. परंतु उजवा कालवा पण आपला आहे आणि डावा कालवा देखील आपलाच आहे. त्यामुळे उजव्या कालव्याबरोबर डाव्या कालव्याचे व चाऱ्यांचे काम देखील पूर्ण करावे अशी मागणी आ. आशुतोष काळे यांनी केली असता त्या मागणीला जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे.




महाराष्ट्र सिंचन सुधारणा कार्यक्रम टप्पा १ अंतर्गत १९१.५८ कोटी रुपये निधीतून करण्यात येणाऱ्या गोदावरी उजवा तट कालव्यावरील माती काम, बांधकाम व अस्तरीकरण करणे कामाचा भूमि पूजन सोहळा शुक्रवार अस्तगाव (ता.राहाता) येथे केंद्रीय जलशक्ती मंत्री ना.सी.आर. पाटील यांच्या हस्ते व जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला.

यावेळी आ. काळे बोलत होते.

आ. काळे म्हणाले की, गोदावरी कालव्यांचे आयुर्मान १०० वर्षापेक्षा जास्त झालेले असून दरवर्षी लोकसंख्या वाढत आहे. धरणा-तील पाण्यावर पिण्याचे व औद्योगिकरणाचे आरक्षण मोठ्या प्रमाणात वाढत असल्यामुळे पर्यायाने शेतीसाठी पाणी दिवसेंदिवस कमी होत चालले आहे. कमी झालेल्या पाण्याची तुट भरून काढण्यासाठी पश्चिमेला समुद्राला वाहून जाणारे पाणी पूर्वेला अती तुटीच्या गोदावरी खोऱ्यात वळविणे अत्यंत गरजेचे आहे. हे पश्चिमेचे पाणी पूर्वेला वळविण्याचे काम जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हातून पूर्ण व्हावे व ते निश्चितपणे पूर्ण करतील, असा विश्वास व्यक्त केला.

तत्पूर्वी केंद्रीय जलशक्ती मंत्री ना.सी. आर. पाटील यांचे काकडी येथील श्री साईबाबा आंतरराष्ट्रीय विमान-तळावर आगमन झाले असता काळे यांनी कोपरगाव मतदारसंघाच्या वतीने त्यांचे स्वागत केले. यावेळी खासदार धनंजय महाडिक, माजी मंत्री आण्णासाहेब म्हस्के पा., मा. खा. सुजय विखे पा., जलसंपदा विभागाचे मुख्य सचिव दिपक कपूर, लाभक्षेत्र विकास सचिव मा.डॉ. संजय बेलसरे, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाचे कार्यकारी संचालक संतोष तिरमनवार, जलसंपदा उत्तर विभागाचे मुख्य अभियंता प्रकाश मिसाळ, कार्यकारी अभियंता श्रीम. सोनल शहाणे, उपविभागीय अभियंता तुषार खैरनार,गौतम बँकेचे मा. चेअरमन बाबासाहेब कोते उपस्थित होते.

# देशाच्या विकासात महाराष्ट्राचा मोठा वाटा

## माजी मंत्री बाळासाहेब थोरात; महाराष्ट्र दिनानिमित्त यशोधन कार्यालयावर ध्वजारोहण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या समतेच्या व बंधुभावाच्या विचारांवर काम करणारा महाराष्ट्र हा विकासात देशात अग्रगण्य आहे. मानवता धर्माचा विचार देणाऱ्या महाराष्ट्राचा देशाच्या विकासात मोठा वाटा असल्याचे गौरवोद्गार काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य बाळासाहेब थोरात यांनी काढले आहे.


महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने शेतकी संघ यशोधन कार्यालय येथे लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी इंद्रजीत थोरात, डॉ. जयश्री थोरात यांसह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

माजी मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, भारतामध्ये विविधता आहे. विविध जाती जमाती समाज हा भारतीय या नावाखाली एकत्र आनंदाने राहतो आहे. लोकशाही व राज्यघटना ही आपली ताकद आहे.

> महाराष्ट्र दिनाबरोबर आज कामगार दिन ही सर्वत्र मोठ्या आनंदाने साजरा होत आहे. महाराष्ट्राच्या प्रगतीमध्ये कायम कामगार व कष्टकरी बंधूंचा मोठा वाटा राहिला आहे. सध्या मात्र जातीभेदाच्या नावावर होणारे राजकारण हे अत्यंत दुर्दैवी असून समतेचा व मानवतेचा महाराष्ट्र धर्म वाढवण्यासाठी तरुणांनी एकत्र येऊन काम करावे.
>
> **– बाळासाहेब थोरात, माजी मंत्री**

संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीमध्ये अनेकांनी हुतात्मे पत्करले. एक मे १९६० रोजी मुंबईसह महाराष्ट्र राज्य निर्माण झाले. महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर पहिले मुख्यमंत्री स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांनी आधुनिक महाराष्ट्राची घडी बसवली.

शेती, सहकार, शिक्षण, ग्रामीण विकास, साहित्य, कला, संस्कृती, औद्योगीकरण, जलसंधारण, विविध पायाभूत सुविधा अशा सर्व क्षेत्रांमध्ये महाराष्ट्राने मोठी प्रगती केली. आर्थिक समृद्धता निर्माण केली. त्यामुळे देशाच्या प्रगतीमध्ये कायम महाराष्ट्राचा वाटा मोठा राहिला आहे. अमृत उद्योग समूहातही थोरात सहकारी साखर कारखाना, राजहंस दूध संघ, अमृतवाहिनी कॉलेज सह्याद्री शिक्षण संस्था यांसह संगमनेर तालुक्यातील विविध गावे व विविध संस्थांमध्ये महाराष्ट्र दिन मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.



# गोळवाडी येथे महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**वैजापूर** : वैजापूर तालुक्यातील गोळवाडी येथील जिल्हा परिषद शाळा व ग्रामपंचायत येथे ध्वजारोहण करून महाराष्ट्र दिन साजरा करण्यात आला.

संपूर्ण महाराष्ट्रामध्ये महाराष्ट्र दिन म्हणजेच कामगार दिन म्हणूनही साजरा करण्यात येतो. त्याचबरोबर प्रत्येक जिल्हा परिषद शाळांमध्ये १ मे रोजी मुलांचे निकाल जाहीर करण्यात आले. जिल्हा परिषद शाळेमध्ये गोळवाडी गावचे सरपंच भाऊसाहेब शिंदे यांनी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या व पुढील शिक्षणासाठी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. महाराष्ट्र दिन साजरा करण्यासाठी सरपंच शिंदे, शाळेच्या मुख्याध्यापिका डिके, रामकिसन धारबळे, सुनील पगार, शिक्षिका आहेर, काळे, वाकचौरे, शिक्षक आळंजकर, चव्हाण, भीमराज पगार, ज्ञानेश्वर पगार यांसह ग्रामस्थ उपस्थित होते.



# ... अखेर स्वाभिमानी शेतकरी संघटनेला यश

## शेवगावातील शेतकऱ्यांच्या खात्यावर पिक विमाचे पैसे जमा होण्यास प्रारंभ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शेवगाव** : २६ मार्च २५ रोजी राज्याच्या कृषी मंत्र्यांनी विधानसभेत शेतकऱ्यांच्या पीक विम्याचे पैसे तातडीने एप्रिल महिन्याच्या सुरुवातीलाच देण्याचे जाहीर केले होते.

या प्रश्नासंदर्भात विधान सभेतील सर्वच विरोधी पक्ष सदस्यांनी प्रश्न उपस्थित केला होता. त्याचबरोबर आमदार सुरेश धस यांनी बीडसह राज्यात मोठ्या प्रमाणात पिक विमा घोटाळा कसा झाला. याबाबत प्रश्न उपस्थित केल्यामुळे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकल चौकशी करून खऱ्या लाभार्थींना कसा न्याय मिळेल यावर एक समिती नेमली व आज शेतकऱ्यांच्या खात्यात पिक विमा जमा होण्यास सुरुवात झाली.

> शासनाने पिक विमा बाबत शेतकऱ्यांनी घोटाळ्या न करता यामध्ये कंपनी आणि सरकारचेच काही मंत्रींनी घोटाळा केल्यामुळे ही पिक विमा मोठ्या बदनामीला सामोरे जावे लागेल लागले आहे, असे असताना शेतकऱ्यांना बदनाम करू नका, असे स्वाभिमानी शेतकरी संघटनेने उपमुख्यमंत्री अजित पवार यांना सोनवले. मात्र याबाबत स्वाभिमानी शेतकरी संघटनेने पिक विमा आमच्या हक्काचा नाही, कोणाच्या बापाचा या म्हणीप्रमाणे हा खेळ शेतकऱ्यांना न्याय दिल्याची भूमिका शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

थोडे उशिरा का होईना? परंतु शेतकऱ्यांच्या बँक खात्यात येण्यास सुरुवात झाली असल्या मुळे काही शेतकऱ्यांच्या मात्र अजून बऱ्याच शेतकऱ्यांच्या खात्यात जमा झालेले नाही.



यामुळे बऱ्याच शेतकऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. परंतु स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या सर्वच तालुका पदाधिकारीशेतकऱ्यांना सर्व पीक विम्याचे पैसे झाल्याशिवाय स्वस्त बसणार नसल्याचे स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हा सरचिटणीस बाळासाहेब फटांगडे यांनी शेतकऱ्यांना आधार दिला.

महाराष्ट्रामध्ये मोठ्या प्रमाणात पिक विमा घोटाळा पूर्वीच्या सरकारच्या काळात व आताच्या सरकारच्या काळात घडल्यामुळे स्वाभिमानी शेतकरी संघटना व शेतकऱ्यांनी व महाराष्ट्रातील विरोधी पक्ष नेत्यांनी या गोष्टीचा सरकारला वारंवार जाब विचारल्यामुळे सरकारला व कंपन्याला अखेर शेतकऱ्यांपुढे झुकावा लागले हा शेतकऱ्यांचा खऱ्या अर्थाने विजय असल्याचा स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी सांगितले तसेच यापुढे

# झोडेगाव ग्रामपंचायतीने चक्क महाराष्ट्रदिनी घेतलीच नाही ग्रामसभा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**गंगापूर** : गंगापूर तालुक्यातील झोडेगाव ग्रामपंचायतीच्या प्रशासनाकडून महाराष्ट्र दिनी म्हणजेच १ मे रोजी ग्राम सभा घेण्यात आलेली नाही. यामुळे संविधान व ७३ व्या घटनादुरुस्तीचे उल्लंघन झाले असून ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

ग्रामसभा ही ग्रामपंचायतीच्या कार्यपद्धतीतील अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया असून, वर्षभरात चार वेळा ग्रामसभा घेणे कायद्याने बंधनकारक आहे. यापैकी एक सभा १ मे रोजी घेणे आवश्यक असते. मात्र, झोडेगावमध्ये ग्रामसभा घेण्यात न आल्यामुळे गावातील विविध प्रलंबित प्रश्न मार्गी लागत नाहीत आणि नागरिकांना आर्थिक तसेच मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. ग्रामसेवक सतत गैरहजर राहत असल्याने गावातील विकासकामे खोळंबली आहेत. नागरिकांच्या तक्रारी वेळेवर ऐकून न घेतल्यामुळे ग्रामपंचायतीचा प्रशासनावर विश्वास कमी होत चालला आहे. गावातील काही ज्येष्ठ नागरिकांनी सांगितले की, ग्रामसभा ही लोकशाहीचा पाया आहे. ती जर वेळेवर घेतली जात नसेल, तर ग्रामपंचायतचा उद्देशच अपूर्ण राहतो. ग्रामस्थांनी यासंदर्भात वरिष्ठ अधिकाऱ्यांने चौकशी करुन लवकरात लवकर योग्य कारवाई व्हावी, अशी मागणी केली जात आहे.



> ग्रामसेवकांना विचारणा केली असता, त्यांनी १ मे रोजी ग्राम सभा घेण्याचा काही विषय नाही असे सांगितले. त्यांच्या या विधानामुळे ग्रामस्थ अधिकच संतप्त झाले असून, ही भूमिका नियमबाह्य असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

# वाबळे कुटुंबीयांची साईबाबा प्रती श्रद्धा वाखाणण्याजोगी

## उद्धव मंडलिक महाराज; गुहा येथे साई सच्चरित पारायण उत्साहात संपन्न

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोल्हार** : अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी तालुक्यातील गुहा येथील तांभेरे रोडवरील वाबळे वस्तीवरील श्री साईबाबा मंदिर येथे दि. १८ ते २५ एप्रिल २०२५ या कालावधीत साई सच्चरित पारायण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. पारायण सोहळ्याचे यंदाचे हे चौथे वर्ष होते. वाबळे वस्ती येथे श्री साई मंदिर असून दररोज पूजा आरती तसेच विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

शुक्रवारपासून सुरू झालेल्या पारायण सोहळ्यास परिसरातील भाविक भक्त महिला पुरुषांनी तसेच येथील तरुणांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. दरम्यान शुक्रवार २५ एप्रिल रोजी सकाळी ९.३० ते ११.३० या वेळेत महंत उद्धव महाराज मंडलिक (नेवासेकर) यांच्या काल्याच्या कीर्तनाने पारायण सोहळ्याची सांगता झाली.

याप्रसंगी माजी आमदार चंद्रशेखर कदम, ज्येष्ठ नेते सिताराम ढूस, पोलीस निरीक्षक संजय ठेंगे, साई आदर्श मल्टीस्टेटचे चेअरमन शिवाजीराव कपाळे, पद्मश्री विखे कारखान्याचे नवनिर्वाचित संचालक श्रीकांत खर्डे, आदर्श नागरी पतसंस्थेचे व्हा. चेअरमन आबासाहेब वाळुंज, गणेश महाराज मसमाडे आदी उपस्थित होते. ग्रंथदिंडीने पारायण सोहळ्याची सांगता झाली. तर सर्व पारायणार्थींना



वाबळे कुटुंबीयांकडून आंब्याचे रोप वाटप करण्यात आले. काल्याच्या कीर्तनानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी प्रेरणा उद्योग समूहाचे संस्थापक सुरेश वाबळे यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व वाबळे कुटुंबीय प्रयत्नशील होते.

> वाबळे कुटुंबीयांची साईबाबा प्रती असलेली श्रद्धा निश्चितच वाखाण्याजोगी आहे. तसेच साईंच्या कृपेने सुरेश वाबळे यांना शिर्डी संस्थानच्या विश्वस्त पदाच्या माध्यमातून देशभरातील साई भक्तांची सेवा करण्याची संधी मिळाली आहे. सहकार क्षेत्राबरोबर धार्मिक क्षेत्रातही वाबळे कुटुंबियांनी आपला ठसा उमटविले आहे.
>
> **– महंत उद्धव महाराज मंडलिक**

# कार्यालयीन कामकाजात हलगर्जिपणा भोवला

## जामखेड पंचायत समितीतील मुंढे निलंबित; एका महिन्यात दुसरा कर्मचारी निलंबित

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड** : गेल्या महिन्यात जिवंत व्यक्तीला मयत दाखवले तसेच कामात हलगर्जीपणा यामुळे एक ग्रामसेवक निलंबन झाले होते. महिन्याभरात परत जामखेड पंचायत समितीमधील कर्मचारी कनिष्ठ सहाय्यक सुरज मुंढे यांना अनाधिकृत गैरहजर राहणे, कार्यालयीन कामकाजात हलगर्जिपणा करणे, वरिष्ठांच्या आदेशाचे अवमान करणे अशा प्रकारचे गैरवर्तनामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी अहिल्यानगर यांनी निलंबनाचा आदेश काढला आहे. यामुळे एकच खळबळ उडाली आहे.

सुरज मुंढे, कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) पंचायत समिती जामखेड येथे कार्यरत असताना अनाधिकृत गैरहजर रहाणे, कार्यालयीन कामकाजात हलगर्जिपणा करणे, वरिष्ठांच्या आदेशाचे अवमान करणे अशाप्रकारचे गैरवर्तन केलेले आहे. सदर बाब ही कार्यालयीन शिस्तीचे उल्लघंन करणारी आहे. मुंढे हे जिल्हा परिषद कर्मचारी असुन त्यांनी सदैव निरपवाद, सचोटीने व कर्तव्य परायण असणे आवश्यक आहे.

> निलंबनाच्या कालावधीत सुरज मुंढे यांनी खाजगी नोकरी स्विकारु नये त्यांनी तसे केल्यास ते दोषारोप त्यांचे वर ठेवण्यात येईल तसेच ते निलंबन निर्वाह भत्ता गमविण्यास पात्र ठरतील.

> सुरज मुंढे यांना महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी स्वीयत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतुन काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील नियम ६८ च्या तरतुदी नुसार निलंबन भत्ता व पुरक भत्ते देण्यात यावे.

तथापि कर्तव्याचे पालन न करुन गैरवर्तन केल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ चे नियम ३ चा भंग झालेला आहे. त्या अर्थी महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे नियम ३मध्ये दिलेल्या तरतुदीस अधिन राहुन मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन या आदेशा द्वारे मुंढे सुरज दिलावर, कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) पंचायत समिती जामखेड, यांना सदर आदेशाच्या दिनांका पासून जिल्हा परिषद सेवेतून निलंबीत करीत आहे.

आणखी असाही आदेश देण्यात येत आहे की, हा आदेश आमलात राहील तेवढया कालावधीत मुंढे सुरज दिलावर, कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) पंचायत समिती जामखेड, यांचे मुख्यालय पंचायत समिती पारनेर येथे राहिल मुंढे सुरज दिलावर, कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) पंचायत समिती जामखेड,यांना गरविकास अधिकारी पंचायत समिती पारनेर यांच्या पूर्व परवानगी शिवाय मुख्यालय सोडता येणार नाही.




# तरुणांनो, भगवान परशुरामाचे अनुकरण करा : डीवायएसपी संतोष खाडे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा** : आजच्या तरुणांनी भगवान परशुरामाचे अनुकरण करणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन डीवायएसपी संतोष खाडे यांनी केले. नेवासा येथील परशुराम प्रतिष्ठानने परशुराम जयंतीचे आयोजन केले होते.

प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रमोद देशपांडे, हभप मृणालिनीताई मुळे, मयूर देवचक्के, सचिन देशपांडे, मुळे गुरु, बाळासाहेब पाटील, सुरेखा बल्लाळ, संजीवनी देशपांडे यांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

प्रतिष्ठानचे मार्गदर्शक बल्लाळ व जयंतराव देवचक्के यांनी समस्त हिंदू समाजाला सोबत ठेवणे, हे ब्राह्मणाचे कर्तव्य असल्याचे मत मांडले. त्यानंतर हभप मृणालिनी



मुळे यांचे भगवान परशुराम यांच्या जीवनचरित्रावर प्रवचन झाले. याप्रसंगी श्री संत ज्ञानेश्वर मंदिर संस्थानचे महंत देविदास महाराज मस्के यांनी उपस्थित राहून आशीर्वचन दिले. तसेच जाई ब्राह्मण समाजाचे अध्यक्ष श्री अभिजीत अष्टेकर यांनी परशुराम प्रतिष्ठानने कार्यक्रमांमध्ये सर्वांना सहभागी केले.

भाजपा मंडलाध्यक्ष मनोज पारखे, अभिजित अष्टेकर, नितीन कुलकर्णी, सतीश पिंपळे, राजाभाऊ थावरे, किशोर सराफ, गुरुप्रसाद देशपांडे, रमेश ओस्तवाल, डॉ. शंकरराव शिंदे, वाघ या मान्यवरांच्या हस्ते आरती झाली. शेवटी महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# महाराष्ट्र गौरव मंगल कलश रथयात्रेचे स्वागत

## श्रीरामपूरचे मा. आ. लहू कानडे यांचा पुढाकार; शेकडो कार्यकर्त्यांची हजेरी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : गौरवशाली महाराष्ट्र महोत्सव १ मे महाराष्ट्र दिनानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष महाराष्ट्र प्रदेश आयोजित महाराष्ट्र गौरव मंगल कलश रथयात्रेचे देवळाली प्रवरा येथील अजित कदम यांच्या निवासस्थानी व राहुरी फॅक्टरीवरील महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासमोर जोरदार स्वागत करण्यात आले.

श्रीरामपूरचे माजी आ. लहू कानडे, पारनेरचे आ. प्रा. काशिनाथ दाते, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अहमदनगर दक्षिण जिल्हाध्यक्ष अशोक सावंत, जिल्हा कार्याध्यक्ष अशोक कानडे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश कार्यकारणी सदस्य अजित दादा कदम, आप्पासाहेब कोकहडे, अरुण पानसंबळ, प्रदीप कदम, शैलजा कदम, शिवाजी ढवळे, गणेश भांड, संजय मुसमाडे, अशोक कदम, किशोर कदम, सोनल कदम, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष प्रशांत कदम, श्रीरामपूरचे तालुकाध्यक्ष कैलास बोर्डे, राष्ट्रवादी काँग्रेसच्या युवती प्रदेशाध्यक्ष संध्या सोनवणे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे जन्मस्थळ असलेल्या देवळाली प्रवरा येथील कदम वस्तीवर, दुपारी २ वाजता महाराष्ट्र गौरव मंगल कलश रथयात्रेचे आगमन झाले. तेथे गोदावरी व प्रवारा नदीचे पवित्र जल व देवळाली प्रवरा येथील मृदा या कलशामध्ये टाकण्यात आली व या कलशाचे विधिवत पूजन करण्यात आले.

> राहुरी फॅक्टरी येथील साई आदर्श मल्टीस्टेटच्या सभागृहामध्ये या रथयात्रेमध्ये सहभागी झालेल्या सर्व मान्यवरांचे स्वागत व सत्कार संस्थापक चेअरमन शिवाजीराव कपाळे यांच्या हस्ते श्री साईबाबांची प्रतिमा विशाल व पुष्पगुच्छ देऊन करण्यात आला.

त्यानंतर हा रथ राहुरी फॅक्टरीवरील महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याकडे रवाना झाला. तेथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास श्रीरामपूरचे मा. आ. तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष लहू कानडे, पारनेरचे आ. प्रा. काशिनाथ दाते, राष्ट्रवादी काँग्रेसचे अहिल्यानगर दक्षिण जिल्हाध्यक्ष अशोक सावंत, जिल्हा कार्याध्यक्ष अशोक कानडे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. रथयात्रेच्या स्वागतासाठी ११ तोफेंची सलामी देऊन फटाक्यांची आतिषबाजी करण्यात आली.

श्रीरामपूरचे मा. आ. लहू कानडे यांनी प्रास्ताविक केले. किशोर थोरात यांनी सूत्रसंचालन केले. अजित कदम यांनी आभार मानले. दुपारी चार वाजता राहुरी कृषी विद्यापीठ व अहिल्यानगर मार्गे ही रथयात्रा पारनेरच्या दिशेने रवाना झाली.



यावेळी अमृत धुमाळ, अजय खिलारी, दिपक ढुस, अमोल सरमाने, अक्षय कर्पे, सचिन जाधव, विलास संसारे, दिपक पाडळे, शिवाजी गांगुर्डे, सतीश बोर्डे, सचिन जगताप, कार्लस साठे, राजेंद्र कोकणे, सुनिल रणनवरे, राजेंद्र औताडे, आबा पवार, दिपक निंबाळकर, सिंकदर पठाण, रुबिना पठाण, भाऊसाहेब गव्हाणे, चांगदेव देवराय, संदीप खरात, सर्जेराव खरात, वेणुनाथ कोतकर, गणेश कोतकर, अशिष शिंदे, हरिभाऊ बनसोडे, सागर मुठे, शिवाजी पवार, जालींदर मुठे, राधाकृष्ण तांबे, आण्णासाहेब ढोणे, अच्युत जाधव यांसह आदी उपस्थित होते.

# अखेर घड्याळ चोरीतील ८ आरोपी जेरबंद

## आरोपींना मिळाली पोलीस कस्टडी; पोलिसांचे कौतुक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव शहर** : शहतील सचिन वॉच या दुकानातून चोरट्यांनी लाखो रुपयांच्या घड्यासह रोकड लंपास केली होती. या घटनेनंतर पोलिसांच्या अकार्यक्षमतेवर ताशेरे ओढण्यात आले होते. अखेर या चोरट्यांना आहिल्यानगर येथील गुन्हे अन्वेषण शाखेच्या पोलिसांना यश मिळाले. या घटनेतील ८ आरोपींना गजाआड करण्यात आले. कोपरगाव शहरातील गुरुद्वारा रोड लगत असलेल्या सचिन वॉच कंपनी या दुकानाचे शटर चादर गँगने तोडून आत मध्ये प्रवेश करून काचेच्या काउंटर मध्ये ठेवलेल्या टायटन कंपनीचे १५५ घड्याळ तसेच



टायमेक्स कंपनीचे १२० घड्याळ असे एकूण २७५ घड्याळ या घड्याळांची बाजार भावा नुसार विक्री किंमत २९ लाख २२ हजार रुपये तर काउंटर मध्ये असलेली रोख रक्कम ३ लाख ४७ हजार रुपये असा एकूण ३२ लाख ६९ हजार रुपये किमतीचा माल व रोख रक्कमेची चोरी झाली होती. याबाबत दुकानाचे मालक संजय लालचंद जैन यांनी कोपरगाव शहर पोलीस स्टेशन मध्ये शनिवार दिनांक १९ एप्रिल रोजी चोरीची फिर्याद दिली होती त्या अनुषंगाने जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी या गुन्ह्याचा तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे वर्ग केला होता. या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांनी सदरचा गुन्हा तपासा कामे सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमंत थोरात पोलीस अंमलदार गणेश भिंगारदे, अशोक लिपणे, प्रमोद जाधव, बाळासाहेब गुंजाळ, सुनील मालणकर, भगवान थोरात, रमिजराजा आत्तार, अमृत आढाव, फुरकान शेख, मेघराज कोल्हे, प्रशांत राठोड व अरुण मोरे आदी पोलिसांचे एक पथक तयार करून आरोपी शोध कामी रवाना करण्यात आले होते. गुन्ह्याचा तपास करत असतांना गोपनीय व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे सदरचा गुन्हा सुरेंद्र जयमंगल दास राहणार घोडासहन बिहार राज्यातील असून त्यांच्या इतर ७ साथीदारांने हा गुन्हा केला असून सदर आरोपी हे सध्या पुणे जिल्ह्यातील शिरूर या परिसरात असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाली. सदरच्या पथकांने मिळालेल्या माहितनुसार आरोपींना बेडल्या ठोकल्या.

### चोरीतील आरोपींची नावे

सुरेंद्र जयमंगल दास, रियाज नईम अन्सारी, पप्पु बिंदा गोस्वामी, राजकुमार चंदन साह, राजकुमार बिरा प्रसाद, नईम मुन्ना देवान, राजकुमार किशोरी प्रसाद, गुलशनकुमार ब्रह्मानंद प्रसाद (सर्व राहणार बिहार राज्य) असे आरोपींचे नावे आहेत.

# कौडगाव येथे मोफत नेत्र तपासणी शिबिर



**जनता आवाज वृत्तसेवा**

**करंजी** : महाराष्ट्र दिन व कामगार दिनाच्या निमित्ताने सोमनाथ कांडके मित्र मंडळाच्या वतीने, कौडगाव जांब येथे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शिबिर संपन्न झाले. या शिबिराचा ग्रामीण भागातील अनेक गरजू रुग्णांनी लाभ घेतला. आहिल्यानगर तालुक्यातील कौडगाव जांब या ठिकाणी कामगार दिनानिमित्त मोफत शिबिराच्या आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन आरटीओ कार्यालयाचे निवृत्त अधिकारी एकनाथ चेमटे यांच्या हस्ते करण्यात आले. या शिबिरात ११७ लोकांची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली. यातील गरजू रुग्णांवर पुणे येथील के. के. बुधरानी हॉस्पिटल या ठिकाणी मोफत शस्त्रक्रिया होणार आहे. यावेळी शिबिराचे आयोजक, युवासेना उपजिल्हाप्रमुख तथा ग्रामपंचायत सदस्य सोमनाथ कांडके यांनी सांगितले की, ग्रामीण भागात विविध आजार वाढत आहेत. रुग्णांना आर्थिक परिस्थितीमुळे योग्य उपचार घेता येत नाहीत. मात्र अशा शिबिरांमुळे अल्पदरात आजाराचे निदान व उपचार मिळतात. त्यामुळे शेतात कष्ट करणारे शेतकरी व कामगार यांच्या प्रति सद्भावना व्यक्त करण्यासाठी आमच्या मित्रमंडळाने या शिबिराचे आयोजन केले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य बाबासाहेब धीवर, नितीन साठे, सोमनाथ थोरात, अक्षय ठोंबरे, अण्णासाहेब थोरात, बापूनाना खर्से, जालिंदर पाटोळे, आनंद धीवर, भास्कर जाधव, राम परभणे, देविदास धीवर, परसराम खर्से, हॉस्पिटलचे कर्मचारी विशाल भिंगारदिवे आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाबासाहेब धीवर यांनी केले.

# चोरीचे भंगार वाहणाऱ्या गाडीवर कारवाई

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी खुर्द** : राहुरी पोलीस पथकाने नगर- मनमाड राज्य महामार्गावर तालुक्यातील राहुरी खुर्द येथे चोरीचे भंगार घेऊन जाणाऱ्या गाडीवर कारवाई केली. यावेळी पथकाने मुद्देमालासह दोघा जणांना ताब्यात घेऊन गुन्हा दाखल केला. दि. २८ एप्रिल रोजी रात्री १०.३० वाजे दरम्यान हवालदार भाऊसाहेब शिरसाट व दारकुंडे हे राहुरी तालुक्यातील राहूरी खुर्द परिसरात पेट्रोलींग करत होते. त्यावेळी त्यांना नगर- मनमाड रोडवरुन एक विनानंबरचा तिन चाकी रिक्षा हा विनालाईट लावता संशयास्पद रित्या तेथुन जाताना दिसुन आला. पोलिसांना संशय आल्याने पोलीस पथकाने त्याचा पाठलाग करुन त्यास पकडले. त्यावेळी मालवाहतूक रिक्षामध्ये भंगार सामान घेऊन दोघेजण जात असल्याचे दिसून आले. पोलिस पथकाने त्यांच्याकडे चौकशी केली असता त्यांनी उडवा उडवीची उत्तरे दिली. मालवाहतूक रिक्षा तसेच तिच्यातील भंगार लोखंडी सामान हे चोरीचे असल्याचे पोलीस पथकाची खात्री झाली. तेव्हा पोलिस पथकाने ७२ हजार रुपयांच्या मुद्देमालासह दोघा जणांना ताब्यात घेतले. हवालदार भाऊसाहेब संजय शिरसाट यांच्या फिर्यादीवरून आरोपी संजु पुनम भुसारे (रा. मांगवाडा, हनुमान मंदिराजवळ, संगमनेर) तसेच रशिद हबीब सय्यद (रा. राहुरी खुर्द, ता. राहुरी) या दोघांवर गुन्हा दाखल केला आहे.

# जीवन यशस्वीतेचा मार्ग ‘स्पर्धा परीक्षा’

## तुंबारे; डुक्रेवस्ती येथे विद्यार्थाचा गुण गौरव सोहळा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**आश्वी** : जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर स्पर्धा परीक्षां शिवाय पर्याय नाही. पालकांनी याबाबत जागृत राहून आपल्या मुलांना अभ्यासा बरोबर नितीमूल्ये व संस्काराचे ही धडे द्यावेत, असे प्रतिपादन गटशिक्षणाधिकारी मोहिनीराज तुंबारे यांनी केले. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, डुक्रेवस्ती (ता. राहुरी) येथील विद्यार्थीना राज्यस्तरीय लक्ष्यवेध व मंथन परीक्षेत मोठ्या संख्याने यश मिळाले.

यानिमित्ताने यशस्वी विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा नुकताच संपन्न झाला. यावेळी सरपंच सतिष ताठे, मुख्याध्यापक अनिल घोलप, वर्गशिक्षिका सुनिता उगले, ज्ञानदेव डुक्रे, आबासाहेब डुक्रे, संतोष डुक्रे, सर्जेराव शिंदे, रमेश शिंदे, योगेश पन्हाळे, गणेश शिंदे, दौलत नागरे,गोपीनाथ डुक्रे, प्रियंका अभंगे, शिक्षक राजेंद्र बोकंद,. राजेद्र शिंदे, प्रभाकर शिंदे,बाबाजी मुंढे यासह ,पालक, ग्रामस्थ उपस्थित होते.



### परीक्षेमध्ये यांनी मिळविले गुण

लक्ष्यवेध परीक्षेत इयत्ता पहिलीची तन्वी गणेश शिंदे हिला १५० पैकी १४० गुण मिळवत राज्यात ४ था क्रमांक तर मंथन परीक्षेत १५० पैकी १३२ गुण मिळवत राज्यात १० वा तर जिल्ह्यात ५ वा क्रमांक मिळविला. लक्ष-वेध परीक्षेत क्षेत रिद्धी गोपीनाथ डुक्रे हिला १५० पैकी ११८ गुण मिळवत जिल्ह्यात १२ वा व मंथन परिक्षेत जिल्ह्यात १३ व केंद्रात ३ रा क्रमांक मिळवला.

# खटोड विद्यालयात महाराष्ट्र दिन साजरा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : श्रीरामपूर येथील भि. रा. खटोड कन्या विद्यालय आज १ मे महाराष्ट्र दिन व कामगार दिन भाजपा तालुकाध्यक्ष बाबासाहेब शिंदे यांचा हस्ते करण्यात आला. यावेळी बंडूकुमार शिंदे (भाजपा सांस्कृतिक जिल्हाध्यक्ष) हे उपस्थित होते. चिडे यांनी त्यांच्या जीवनाचा संघर्ष या विद्यार्थिनी समोर ठेवला.



त्यांनी अनेक गोष्टींना उजाळा देत मी सुद्धा एक गरीब शेतकरी कुटुंबातून येत असून मी मोठ्या कष्टाने व जिद्दीने माझ्या स्वतःच्या मेहनतीवर हे सर्व उभ केल आहे. माणसाच्या मनामध्ये जर जिद्द असेल तर सर्व शक्य होतं असं यावेळी त्यांनी सांगितले. माणसांनी स्वप्न बघावं आणि त्या स्वप्नांचा पाठलाग करावा सोबत कष्टाची जर साथ असेल तर अशक्य असं काहीच नाही. ‘स्वच्छ असाल तर सुंदर दिसाल’ असा कानमंत्र देखील त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. या कार्यक्रमासाठी उपस्थित असलेले विद्यालयाचे चेअरमन दत्तात्रय साबळेल, ज्युनिअर विभाग चेअरमन डॉ. रिमा गोसावी, प्राचार्या सौनंदा कानिटकर, उपमुख्याध्यापिका श्रीमती रश्मी कसार, पर्यवेक्षिका मंगला डोळस व अनिता शिंदे हिंद सेवा मंडळ पतपेढीचे संचालक प्राध्यापक सतीश म्हसे, सेवक प्रतिनिधी प्राध्यापक आदिनाथ जोशी, बालिका विद्यालयाच्या संगीत विभाग प्रमुख उषा अशोक गाडेकर आदी उपस्थित होते.

# शाळेला राष्ट्रीय ध्वज उतरविण्याचा विसर

## कायदेशीर कारवाई करण्याची मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**गंगापूर** : गंगापूर तालुक्यातील झोडेगाव येथे महाराष्ट्र दिनी म्हणजेच १ मे रोजी ध्वजारोहण समारंभ उत्साहात पार पडला. सकाळी शाळेच्या प्रांगणात पारंपरिक पद्धतीने ध्वज उभारण्यात आला, विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमानंतर शाळेचे कामकाज लवकर आटोपले गेले आणि सर्व शिक्षक आपल्या परीने रवाना झाले. मात्र, सर्वसामान्य नियमांनुसार शाळेच्या आवारात लावलेला राष्ट्रीय ध्वज



संध्याकाळी सूर्योदयानंतर आणि सूर्यास्ताच्या आधी उतरवणे बंधनकारक असते. पण कार्यक्रम संपल्यानंतर आपल्या परीने प्रसार होताना आढळून आले. झोडेगाव शाळेतील शिक्षक व कर्मचाऱ्यांकडून या महत्त्वाच्या जबाबदारीचा विसर पडल्याचे निदर्शनास आले आहे. संध्याकाळपर्यंत ध्वज त्या ठिकाणीच उभा होता, जो एकप्रकारे ‘राष्ट्रीय ध्वज संहिता २००२’च्या नियमांचे उल्लंघन मानले जाते.

# अल्पवयीन मुलीचे अपहरण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी खुर्द** : राहुरी तालुक्यातील लाख परिसरातून एका १५ वर्षीय अल्पवयीन मुलीचे तीच्या राहत्या घरा-तून अपहरण करण्यात आले. ही घटना दि. २७ एप्रिल रोजी पहाटेच्या सुमारास उघडकीस आली. या घटने बाबत अज्ञात इसमा विरोधात अपहरणचा गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेतील १५ वर्षे २ महिने वय असलेली अल्पवयीन मुलगी तीच्या कुटुंबासह राहुरी तालुक्यातील लाख परिसरात राहते.

दि. २६ एप्रिल २०२५ रोजी रात्री १० वाजेच्या सुमारास पिडीत मुलगी व तीच्या घरातील सर्वजण जेवण करुन झोपी गेले. त्यानंतर दि. २७ एप्रिल रोजी पहाटे ५ वाजे दरम्यान पिडीत मुलगी घरातून बेपत्ता झाल्याचे दिसून आले. नातेवाईकांनी पिडीत मुलीचा परिसरात शोध घेतला. मात्र ती कोठेही आढळून आली नाही. कोणीतरी अज्ञात इसमाने, अज्ञात कारणासाठी तीला पळवुन नेले.

अशी खात्री झाल्या नंतर पिडीत मुलीच्या आईने रा-हुरी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्या अवस्थेत अज्ञात इसमा विरोधात गुन्हा रजि. नं. ४९५/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम १३७ (२) प्रमाणे अपहरणचा गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेचा पुढील तपास पोलिस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनात सुरु आहे.

# शिंदेवाडी येथे सर्वात उंच शिव ध्वज उभारला

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत** : कर्जत तालुक्यातील शिंदेवाडी येथे सर्वात उंच शिव ध्वज याची उभारणी करण्यात आली. तसेच याचवेळी राजे युवा ग्रुप या संघटनेची देखील स्थापना करण्यात आली. यावेळी कापरेवाडी ग्रामपंचायतीचे सरपंच अनिल खराडे, हर्षा अनिल खराडे, एडवोकेट योगेश कापरे, सकल मराठा समाजाचे समन्वयक रावसाहेब धांडे, यांच्यासह राजे युवा ग्रुप या संघटनेचे सर्व पदाधिकारी सदस्य व मोठ्या संख्येने ग्रामस्थ, महिला यावेळी उपस्थित होत्या.

शिंदेवाडी येथे महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधन ८० फूट उंचीचा भगवा ध्वज उभा करण्यात आला. तत्पूर्वी या ध्वजाची गावांमधून भव्य मिरवणूक काढण्यात आली. गावातील सर्व मंदिरांना ढोल ताशाच्या हलगीच्या निनादात व फटाके फोडून प्रदक्षिणा करून यानंतर या भव्य अशा ध्वजाची उभारणी करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज की जय.. हर हर महादेव.. या घोषणांनी संपूर्ण शिंदेवाडी गाव दणाणले होते. विधिवत पूजा झाल्यानंतर हा भव्य असा ध्वज सर्व मान्यवरांच्या हस्ते उभा करण्यात आला. सरपंच अनिल खराडे म्हणाले की, राजे युवा ग्रुप या संघटनेची स्थापना झाल्याची मी अधिकृत घोषणा आज या ठिकाणी करत आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांचा इतिहास सर्व युवकांना आणि पुढच्या पिढीला कायम लक्षात रहावा आणि तो आदर्श सर्वांनी समोर ठेवावा,यासाठी हा भगवा ध्वज सर्व युवक आणि ग्रामस्थ यांनी पुढाकार घेऊन उभा केला आहे. हा अतिशय स्तुत्य उपक्रम असून याबद्दल मी सर्वांचे आभार व्यक्त करतो.



# फिजा सय्यद हिला क्रीडा पुरस्कार प्रदान



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले** : अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले येथील आंतरराष्ट्रीय सॉफ्टबॉल खेळाडू फिजा सय्यद हिला जिल्हा क्रीडा पुरस्कार महाराष्ट्र दिनी अहिल्यानगर येथे प्रदान करण्यात आला आहे. १ मे महाराष्ट्र दिनी अहिल्यानगर येथे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांचे हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला, जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरगे आदी उपस्थित होते. सॉफ्टबॉल क्रीडा प्रकारात केलेल्या उत्कृष्ट कामगिरी बद्दल सन २०१९ - २० या वर्षीचा जिल्हा क्रीडा पुरस्कार कु.फिजा फत्तू सय्यद हिला घोषित केला आहे. त्याचे वितरण जिल्हा पोलीस ग्राउंड वरती करण्यात आले. फिजा सय्यद ही सॉफ्टबॉल खेळाडू असून अनेक राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्पर्धा मध्ये उत्कृष्ठ कामगिरी केली आहे. तिच्या कार्याचा गौरव म्हणून तीला हा पुरस्कार प्राप्त झाला असून तिचे या यशाबद्दल सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.

# अजय गदीया यांचे निधन



**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : येथील संजय ट्रेडींग कंपनीचे मालक, कांदा व्यापारी अजय कांतीलाल गदीया (वय ४९) यांचे गुरूवार दि. १ मे रोजी हृदयविकाराच्या तीव‘ झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, २ मुले, २ भाऊ, सुना व नातवंडे असा परिवार आहे. ते संजय, विजय, रवींद्र, महेंद्र, व जितेंद्र गदीया यांचे बंधु व ऋषभ, संभव गदीया यांचे वडील होते. श्रीरामपूर तालुक्यात अजय गदीया हे कांद्याचे प्रमुख व्यापारी म्हणून शेतकरी वर्गात व बाजारपेठेत त्याचा लौकीक होता. अमरधाममध्ये १ मे रोजी अंत्यसंस्काराच्या वेळी सर्व क्षेत्रातील कार्यकर्ते, व्यापारी, जैन समाज मोठ्या सं‘येने उपस्थित होते.

# पंचवीस वर्षांनंतर मिळाला आठवणींना उजाळा

## साकुरीतील जि. प. शाळेतील विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**साकुरी** : राहाता तालुक्यातील साकुरी गावातील जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळा मधील २००० सालातील सातवी पास चे विद्यार्थी- विद्यार्थीनी ने एकत्र येऊन एक छान असा गेट टुगेदर पार पाडला. ह्याला एकूण ५० विद्यार्थी आले होते. शाळा आणि शाळेतील मित्र एक अनोखा संगम, त्यातल्या त्यात बाल मित्र सातवी पर्यंतचे बाल मित्र मैत्रिणी म्हणजे अस्सल मैत्री, निस्वार्थी मैत्री आणि त्यातून एकमेकात तयार



झालेले प्रेमाचे बंध हे आयुष्यभर जपले जातात. ही प्रेमाची शिदोरी कायम आयुष्यात कामाला येते. मैत्री निस्वार्थी प्रांजळ आणि कपटरहित असली पाहिजे मैत्री चांगली असली तरी मित्र चांगले भेटणे महत्वाचे आहे. कपट आणि दुष्मनानाने हस्तक मित्र काही कामाचे नसतात. बालमित्र निस्वार्थी असतात, त्यांची मैत्री आयुष्यभर टिकते. काही लोक मात्र व्यावहारिक दृष्टीकोन समोर ठेवतात काहींना मित्र वापरून सोडून द्यायचे व्यावहारिक उधारी करायची आणि नाते संपायचे असेही घडते. पण बालमित्र याला अपवाद असतात. सर्व बाल मित्रांनी आपला परिचय, आपला व्यवसाय नौकरी आणि राहण्याचे ठिकाण सांगून आपल्या भावना व्यक्त केल्या. सर्व विद्यार्थ्यांना समोर येऊन बोलण्याची संधी दिली. सर्वजण बोलले व्यक्त झाले भावनांना बिनधास्त व्यक्त होताना बऱ्याच जणांनी त्या काळाच्या झालेल्या चुकांची माफी मागितली, काहींनी अधुरे स्वप्न पुरे केल्याचा आनंद व्यक्त केला. काहींनी आम्हाला भेटल्यावर किमान बोलत तरी याव, असा अट्टाहास केला. तर काहींनी मी काय होतो? आज काय आहे आणि काय असलो तरी मित्रांशिवाय काहीच नाही. जीवनात चांगले मित्र असणं गरजेचं आहे, अशा भावना व्यक्त केल्या. यावेळी तत्कालीन मुख्याध्यापक रावसाहेब कमोदे, शिक्षिका शकुंतला कमोदे, दत्तात्रय गजरे, रमेश भोसले, नामदेव गवते, मंदाकिनी अरूंकर, उषादेवी थोरात, संगीता ठा नगे, गांधी मॅडम, मुख्याध्यापक अरुण बनसोडे यांचा सन्मान करण्यात आला. तब्बल पंच वीस वर्षांनी न भेटलेली ही पाखर एकदा एक दिवस सोबत राहून परत आपापल्या सांसारिक गुंतागुंतीत कार्यक्रमाचे पुन्हा व्यस्त झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राकेश रायसोनी यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नीरज कदम,प्रसाद चोळके, किरण मुळे, जितेंद्र जाधव यांनी मेहनत घेतली.

२५ वर्षापूर्वी ज्या विद्यार्थ्यांना आपण शिकवले व घडवले. त्यांनी आज आमचा सन्मान केला, यावर विश्वास बसत नाही. या विद्यार्थी यांनी केलेल्या सत्कार सोहळ्यामुळे आम्ही भारावून गेलो आहे. आमच्या नोकरीचे सार्थक झाल्याचे आज आम्हाला वाटत आहे.

**- संगीता ठाणगे, तत्कालीन शिक्षिका.**

# अस्मिता

## काकडी खा, थंडावा मिळवा

**बीट द हीट**

उन्हाच्या झळा वाढत आहेत. या उष्ण काळात आपल्या खाण्यापिण्याच्या सवयी आणि कपड्यांमध्ये अनेक बदल होतात. बरेचजण आहारात शरीराला थंडावा देणाऱ्या घटकांचा समावेश करतात. तुम्हीही अशाच पदार्थांच्या शोधात असाल तर काकडीच्या सेवनाकडे दुर्लक्ष करु नका. शक्यतो काकडी सॅलड म्हणून खाल्ली जाते. मात्र उष्णतेवर मात करण्याव्यतिरिक्त काकडीच्या सेवनाने वजन कमी करण्यास आणि पचन सुधारण्यासही मदत होते. म्हणूनच काकडीला 'सुपरफूड' म्हणतात. चला जाणून घेऊ या, काकडी आहाराचा भाग बनवण्याचे काही फायदे.



✻ प्रचंड उष्णतेमुळे लोक उष्माघात आणि त्याच्याशी निगडित आजारांचे बळी ठरतात. अशा परिस्थितीत, काकडीचे थंड गुणधर्म केवळ संरक्षणच देत नाहीत तर आरामही देतात. तुम्हाला उष्णतेचा त्रास असेल त्यापासून आराम मिळण्यासाठी डोक्यावर तसेच डोळ्यांवर काकडीच्या थंड केलेल्या चकत्या ठेवा.याने शरीरातील उष्णता कमी होईल.

✻ कॅलरी कमी आणि फायबर भरपूर प्रमाणात असल्याने उन्हाळ्यात काकडीचे सेवन वजन कमी करण्यास साह्यभूत सिद्ध होते. काकडी अँटिऑक्सिडंट्स आणि फ्लेव्होनॉइड्ससह शरीराचे पोषण करणाऱ्या अन्य घटकांनी समृद्ध असते. शरीराला त्याचा चांगला लाभ मिळतो.

✻ तुमचे डोळे उष्णतेमुळे तळावले असतील किंवा सुजले असतील तर काकडीच्या फोडी १०-१५ मिनिटे डोळ्यांवर ठेवा. यामुळे तणावातून आराम मिळू शकतो तसेच डोळे ताजेतवाने होतात. जळजळ कमी होते.

✻ काकडीत मोठ्या प्रमाणात पाणी असल्यामुळे आहारात समावेश केल्यास शरीरातील पाण्याची कमतरता दूर होण्यास मदत होते. अशा परिस्थितीत उन्हाळ्यात आहारात काकडीचा समावेश केल्यास डिहायड्रेशन थांबते.

✻ पोटॅशियम, मॅग्नेशियम आणि फायबरने समृद्ध असणारी काकडी रक्तदाब आणि हृदयाशी संबंधित समस्यांचा धोका कमी करण्यास मदत करू शकते.

✻ पचन सुधारण्यासाठी आहारात काकडीचा समावेश करा, कारण ही काकडी खाल्ल्याने पोटाला थंडावा मिळतो. पचनक्रिया सुधारते आणि मलप्रवाह नियमित होण्यास मदत होते.

✻ मधुमेहाचा त्रास असेल तर काकडी तुमच्यासाठी खूप फायदेशीर ठरेल. आहारात काकडीचा समावेश केल्याने रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित राहण्यास मदत होते, जी मधुमेहामध्ये फायदेशीर मानली जाते.

✻ काकडीचा रस लावल्याने त्वचा तजेलदार आणि मुलायम राहते. याव्यतिरिक्त, दाहक-विरोधी गुणधर्म असल्याने काकडीचा लेप लावल्यास त्वचेचा वर्ण सुधारू शकतो. टॅनिंग कमी होते खेरीज सुरकुत्या आणि बारीक रेषाही कमी होतात.

## 'शैली'च्या यशाची शैली

**मानिनी**

**केसांच्या उद्योगातील व्यवसाय हाती घेईल, अशी आईला अपेक्षा नव्हती, असे आजची आपली मानिनी शैली बुलचंदानी सांगते. शैलीने हा व्यवसाय अवघ्या २,००० रुपयांपासून सुरु केला असला तरी आणि त्यातील उलाढाल काही कोटीच्या घरात पोहोचली आहे. याशिवाय तिला 'शार्क टँक'मध्ये १० कोटी रुपयांच्या मुल्यांकनाचा निधीही मिळाला आहे. जाणून घेऊ या शैलीच्या यशाची आकर्षक शैली...**

शार्क टँक इंडिया'मध्ये सहभागी झालेले सर्वच स्पर्धक जोमाने व्यवसाय करतात आणि खूप नफा मिळवतात असं नाही. मात्र या कार्यक्रमाच्या तिसऱ्या सिझनमध्ये आलेल्या शैली बुलचंदानीने आपला व्यवसाय भरभराटीला आणला. वयाच्या अवघ्या २४ व्या वर्षी ती सर्वांचं लक्ष वेधून घेत आहे.

तिने केसांच्या उद्योगात काहीतरी नवीन करण्याचा विचार केला आणि 'द शेल हेअर' नावाचा स्टार्टअप सुरू केला तेव्हा ती अवघ्या वीस वर्षांची होती. सोबतच तिचा अभ्यासही सुरू आहे. हा सगळा व्याप सांभाळत तिने स्वप्न गाठण्याचा प्रयत्न केला. तिचा व्यवसाय हेअर एक्स्टेंशन, विग, टॉपर्स, बँग्स आणि कलरफुल स्ट्रीक्सचा आहे. आपला व्यवसाय आजच्या तरुणाईवर केंद्रित आहे ज्यांना खूप स्टाइलिश दिसणे आवडते, असे शैली सांगते. तिचा आत्मविश्वास आणि उत्कृष्ट व्यवसाय पाहून शार्क टँकमधील न्यायाधीशही प्रभावित झालेले दिसले. अशा या शैलीच्या प्रवासाबद्दल जाणून घ्यायलाच हवे.

आधी उल्लेख केल्याप्रमाणे वयाच्या अवघ्या २० व्या वर्षी शैलीने व्यवसाय करण्याचा विचार केला होता. त्या वेळी व्यवसाय सुरू करण्यासाठी तिला पहिली गोष्ट सापडली ती म्हणजे केस! जयपूरमधील एका विक्रेत्याकडून तिने २,००० रुपये किमतीचे केस घेतले आणि नंतर स्वतःच्या शिलाई मशीनने त्या केसांच्या आकर्षक रचना करुन, सुयोग्य आकार देऊन आपल्या नातेवाईकांना विकले. अर्थातच तिच्या या कल्पनेला चांगला प्रतिसाद मिळाला आणि तिचे आत्मबळ वाढत गेले. त्याच्या मदतीने, शैली बुलचंदानीने २०२० मध्ये 'द शेल हेअर'चा पाया रचला. आज शेल हेअर हा असा एक ब्रँड आहे ज्याने हेअर इंडस्ट्रीमध्ये एक विशेष स्थान निर्माण केले आहे. याच कामात नाविन्यपूर्ण प्रयोग सुरू केल्यानंतर चांगला प्रतिसाद मिळू लागल्याचे पाहताच तिने आपली वेबसाइट तयार केली आणि या माध्यमातून तिच्याकडे अनेक ऑर्डर्स येऊ लागल्या. सध्या, शैलीच्या स्टार्टअपची वार्षिक कमाई सुमारे १.२ कोटी रुपये इतकी आहे.



हा व्यवसाय हाती घेईल, अशी आईला अपेक्षा नव्हती, असे शैली सांगते. शैलीने हा व्यवसाय अवघ्या २००० रुपयांपासून सुरु केला असला तरी आणि त्यातील उलाढाल काही कोटीच्या घरात पोहोचली आहे. याशिवाय तिला 'शार्क टँक'मध्ये १० कोटी रुपयांच्या मुल्यांकनाचा निधीही मिळाला आहे. कोट्यवधींची कंपनी उभी करत असताना शैलीने आपला अभ्यास मागे पडू दिला नाही हे विशेष. आज ती आयटी मध्ये एमएससी करत आहे. शैली तिचा अभ्यास आणि व्यवसाय यात उत्तम समतोल साधते. आपले महाविद्यालय शैक्षणिक उपक्रम आणि उद्योजकता या दोन्हीतही काम करण्यास विद्यार्थ्यांना उद्युक्त करत असल्याचे ती अत्यंत अभिमानाने सांगते.

## स्वत:च व्हा शिल्पकार

**विचार करा**

माधुरी दीक्षितचा 'बकेट लिस्ट' आठवतोय? आयुष्यातील अपूर्ण इच्छांचा पाठपुरावा करण्याचा मार्ग म्हणजे 'बकेट लिस्ट'... आपलीही बकेट लिस्ट असावी असं प्रत्येकीला वाटू लागलं आहे. असं असलं तरी, बकेट लिस्ट कशी असावी याचा पडताळा घेणं महत्त्वाचं आहे. अर्थातच केवळ मद्यपान करणं किंवा भल्या मोठ्या स्टेजवर डान्स करणं अशा बाबींनी प्रत्येकीचीच बकेट लिस्ट पूर्ण होते असं नाही. प्रत्येकीची स्वप्ने, ध्येय वेगळी असतात. खरं तर एखाद्या स्त्रीची बकेट लिस्ट खास तिच्यासाठीच अशी असावी. म्हणजे आयुष्यभर इतरांसाठी खस्ता खाल्लेल्या तिने स्वत:ला अशा यादीमध्ये महत्त्व दिलं तर त्यात काहीही गैर नाही.

स्त्रिया आयुष्यभर इतरांसाठी झटत असतात. प्रसंगी स्वत:च्या हिताचा त्याग करूनही इतरांसाठी आयुष्य खर्च करतात. बाहेर गेलं की आपल्याला सर्व्हिस देणाऱ्या वेटरलाही टिप दिली जाते. पण, निस्वार्थी भावनेने काम करणाऱ्या घरातल्या स्त्रियांना कौतुकाचे दोन शब्द अभावानेच मिळतात. त्यामुळेच बकेट लिस्ट ही अशा स्त्रियांसाठी स्वत:ला वेळ देण्याची उत्तम गुरुकिल्ली आहे. पण स्त्रियांनीही बकेट लिस्टचा खरा अर्थ समजून घेणं गरजेचं आहे. खूप प्रवास करायचाय किंवा खूप पुस्तकं वाचायची आहेत हे कोणाच्याही बकेट लिस्टमध्ये असू शकतं. पण भविष्यासाठी केवळ स्वत:साठी गुंतवणूक करण्याचा मुद्दा कितीजणींच्या बकेट लिस्टमध्ये असतो बरं? पाच आकडी पगार मिळवणाऱ्या स्त्रियाही आर्थिकदृष्ट्या परावलंबी असतात. स्वत:चं अर्थभान स्वत: जपण्याची इच्छादेखील या लिस्टमध्ये असायला काय हरकत आहे? घरात कोणी आजारी पडलं तर घरची स्त्री रात्रीचा दिवस करते पण दर महिन्याला ब्रेस्ट टेस्ट करण्याची नोंद कितीजणी आपल्या बकेट लिस्टमध्ये करतात बरं? आयुष्यात एक वळण असंही येतं ज्यावेळी नवरा, मुलं आपापल्या व्यापात गढलेली असतात. रोजचा रिकामा वेळ खायला उठतो. त्यावेळी केवळ तकलादू तत्त्वांवर आधारलेल्या सिरियल्स पाहण्याऐवजी काही तरी नवं शिकण्याची विश देखील या लिस्टची शान बनू शकते.



## सायबर मॉबिंगचा धोका

**पॅरेंटिंग**

आजकाल मुलभूत गरजांच्या यादीमध्ये इंटरनेटचाही समावेश करावा अशी परिस्थिती आहे. कमी वयातील मुलंही इंटरनेटचा सर्रास वापर करताना दिसतात.




सोशल मीडियाचा वापर करताना अनेकदा अजाणतेपणाने त्यांच्याकडून चुका होतात. याचा परिणाम त्यांच्या मनावर होतोच; शिवाय भविष्यावरही होण्याची शक्यता नाकारता येत नाही. भारतात सायबर मॉबिंगचा प्रभाव वाढताना दिसून येत आहेत. सायबर बुलिंग म्हणजे सोशल मीडियाच्या सहाय्याने मुलांना धमकावणं, त्यांना अनैतिक गोष्टी करण्यास भाग पाडणं किंवा ब्लॅकमेल करणं होय. यामध्ये विशिष्ट गट किंवा संघटना किंवा एखादी व्यक्ती मुलांना इंटरनेटच्या माध्यमातून आपल्या जाळ्यात ओढते. सुरुवातीला काही आमिष दाखवून या मुलांवर प्रभाव टाकला जातो. त्यांच्याशी मैत्री केली जाते आणि विश्वास बसला की त्याचा फायदा घेतला जातो. कालांतराने मुलांना चुकीची जाणीव होते. पण घरच्यांसमोर मन मोकळं न करता आल्याने मुलं कुढतात किंवा आत्महत्येसारखा भीषण मार्ग निवडतात. भारतात सुमारे पन्नास टक्के युवावर्ग इंटरनेटच्या अधीन आहेत. इंटरनेटचा वापर आजकाल सगळेच जण करत आहेत. पण त्याच्या दुष्परिणामांच्या निवारणासाठी कोणतीही ठोस उपाययोजना केली जात नाही. याबद्दलचे कायदेही अगदी लेचेपेचे आहेत त्यामुळे दोषींवर जुजबी कारवाई केली जाते. सायबर बुलिंगलाच सायबर मॉबिंग असंही म्हटलं जातं. मुलांवर अशा घटनांचा परिणाम होतो. मुलांना सायबर बुलिंगपासून दूर ठेवण्यासाठी कमी वयात सोशल मीडियाचा वापर करू देऊ नये. नेटवर्किंग साईटवर ॲक्टीव्ह असलेल्या पाल्यांच्या मित्रांची माहिती घ्यावी. सायबर बुलिंगसारख्या प्रकाराबद्दल मुलांना विश्वासात घेऊन सांगावं.

## अनुसरा ऑर्गेनिक फॅशन

**फॅशन मंत्रा**

आजकाल इको फ्रेंडली वस्तू वापरण्याचा ट्रेंड आहे. या इको फ्रेंडली लाटेत फॅशन विश्व कसं मागे राहिल? इको फ्रेंडली फॅशनच्या ट्रेंडला सेलिब्रिटीही आपलसं करताना दिसून येत आहेत. या नव्या ट्रेंडविषयी जाणून घेऊ या.

ऑर्गेनिक फॅशनमध्ये कार्बनिक कॉटन, बांबू फॅब्रिक, हातमागावर विणलेलं फॅब्रिक आदींचा समावेश होतो. धागे रंगवण्यासाठी वापरलेले रंग नैसर्गिक पद्धतीने तयार केलेले असतात. या रंगांमुळे त्वचेला हानी पोहचत नाही. कृत्रिम रंगांमुळे त्वचेवर रॅशेस येणं, ॲलर्जी येणं असे प्रकार घडतात. त्यामुळे काही काळापासून ऑर्गेनिक कपड्यांकडे ओढा वाढताना दिसत आहे.



✻ सध्या पर्यावरण रक्षणासाठी विविध उपाय योजले जात आहेत. अशा वेळी कपड्यांवर ऑर्गेनिक रंगांचा प्रयोग करून टेक्सटाईल इंडस्ट्रीतील प्रदुषणाला आळा घालणं शक्य आहे. त्यामुळे पर्यावरण संरक्षण आणि त्वचेचं आरोग्य जपणं हे दोन्ही हेतू साध्य होतील.

✻ ऑर्गेनिक पद्धतीने कापड विणताना नैसर्गिक तत्वांचा वापर केला जातो. त्यामुळे या कपड्यांमुळे प्रदुषणाचा धोका टळतो.

✻ ऑर्गेनिक फॅशन इंडस्ट्री विस्तारत आहे. त्यामुळे या उद्योगातील कारागीर, लघु उद्योजक यांच्या आर्थिक विकासालाही हातभार लागत आहे.

✻ ऑर्गेनिक पद्धतीने कापड बनवण्याची प्रक्रिया क्लिष्ट असते. त्यामुळे या कपड्यांच्या किमती जास्त असतात. पण त्यांचा वापर आरोग्यदायी ठरतो हे लक्षात ठेवावं आणि त्यांचा वापर करावा.

## मार्क्स घालवण्यासाठी...

**ब्युटी मंत्रा**

मातृत्वाचा क्षण स्त्रियांच्या जीवनातील सर्वोत्तम क्षण असतो. गरोदरावस्थेत स्त्रियांच्या शरीरात अनेक बदल होत असतात. गरोदरपणात दिसामासी पोट वाढताना आसपासची त्वचाही ताणली जाते. त्यामुळे स्ट्रेच मार्क्स येतात. अचानक वजन कमी झालं तरी स्ट्रेच मार्क्स दिसून येतात. ही समस्या असल्यास विशिष्ट पॅटर्नच्या आवडत्या प्रावरणांना हातही लावता येत नाही. पण हे मार्क्स घालवण्यासाठी महागड्या क्रीमवर खर्च करण्यापेक्षा घरगुती उपायही उपयुक्त ठरतात. त्याविषयी अधिक जाणून घेऊ.




✻ **कोको बटर आणि कॉफी–** एक चमचा कॉफीमध्ये एक चमचा कोको बटर मिसळावं. ते मार्क्सवर लावावं. दहा मिनिटांनी कोमट पाण्याने धुवून टाकावं. आठवड्यातून चार वेळा हा प्रयोग केल्यास फरक जाणवतो.

✻ **बदाम पावडर, खोबरेल तेल आणि कॉफी–** चमचाभर कॉफीत अर्धा चमचा बदाम पावडर आणि तीन चमचे खोबरेल तेल मिसळावं. ही पेस्ट दहा मिनिट मार्क्सवर लावून ठेवावी. आठवड्यातून दोन वेळा असं केल्यास फरक जाणवू लागेल.

✻ एक चमचा कॉफी पावडर, एक चमचा ऑलिव्ह ऑईल, अर्धा चमचा लिंबाचा रस ही सामग्री एकत्र करावी. तयार पेस्ट मार्क्सवर वीस मिनिटं लावून ठेवावी. त्यानंतर गरम पाण्यानी धुवावं. असं केल्याने काही दिवसांमध्येच फरक जाणवू लागतो.

## ...तर तणाव निवळेल

**कौन्सेलिंग**



मी एकत्र घरात वाढलेली स्त्री आहे. लग्नानंतरही बरेच दिवस मी एकत्र कुटुंबात राहिले. माझ्या मुलांप्रमाणे जाऊबाईच्या मुलांचं प्रेमाने संगोपन केलं. माझी जाऊ नोकरी करायची तर मी घर सांभाळायचे. त्यामुळे तिच्या मुलांना तिच्यापेक्षा जास्त माझा लळा लागला. त्यांच्या शिक्षणाची सगळी जबाबदारी मी उचलली. या घनिष्ट संबंधांमुळे त्यांचं मित्रमंडळ मला त्यांची आईच समजत असे. मात्र याच स्नेहबंधामुळे आता जाऊबाई आणि मुलांमध्ये वितुष्ट आलं आहे. पुतण्याने नॉमिनी म्हणून माझं नाव पुढे केल्यापासून जाऊबाई आणि दिराने आमच्याशी वैर धरलं आहे. मी मुलांना त्यांच्यापासून तोडलं, अशी तक्रार आहे. काय करु, ही कौटुंबिक समस्या कशी हाताळू?

– संस्कारक्षम वयामध्ये निकट असणाऱ्यांचा, सांभाळ आणि कोडकौतुक करणाऱ्यांचा मुलांना लळा लागतो. त्यांच्यामध्ये हळवे भावबंध निर्माण होतात जे प्रसंगी रक्ताच्या नात्यापेक्षाही घट्ट होतात. तुमचे पुतण्याशी असणारे संबंध तसेच आहेत. पण हे काही जाणूनबुजून, एखाद्या स्वार्थापोटी केलेलं नाही. त्यामुळे सर्वप्रथम स्वत:ला दोष देणं बंद करा. आता आर्थिक अंगाने उद्भवलेला प्रश्न संवादानेच सोडवायला हवा. याबाबत तुम्ही पुतण्याशी चर्चा करा. पुढे लग्न झाल्यानंतर बायकोही यावर आक्षेप घेऊ शकेल आणि त्या नात्यामध्येही वितुष्ट येऊ शकेल ही बाब त्याला समजावून सांगा. त्याचा हा निर्णय बदलला की समस्येचं गांभीर्य कमी होईल आणि नात्यामधील तणाव निवळण्यास मदत होईल.

## ट्रेंड मॅनिया

### लवकर करा व्यायाम

उन्हाचा ताप वाढत असताना या दिवसांमध्ये व्यायाम करण्याची योग्य वेळ कोणती? हा प्रश्न पडतो. खेरीज उन्हाळ्यात आरोग्यासाठी उत्तम व्यायाम कोणता, हा तुमचा प्रश्न असेल तर सकाळी लवकर व्यायाम केल्याने अनेक आरोग्य फायदे मिळतात, हे लक्षात घ्या. यावेळी वातावरणात ऑक्सिजनचे प्रमाण जास्त असते. मनही शांत, ताजेतवाने असते. सकाळच्या व्यायामामुळे झोपेची गुणवत्ता देखील सुधारते. चयापचय वाढवण्यास मदत होते.



## ॲक्सेसरीज

### मोबाईलपासून दूर ठेवा

सतत मोबाईलमध्ये व्यस्त राहिल्याने मुलांमध्ये नैराश्य, राग, चिंता यासारख्या नकारात्मक भावना बळावत आहेत. त्यामुळे झोपेची पद्धतही बिघडत आहे. चिडचिडेपणा आणि भावनिक अस्थिरता वाढत आहे. म्हणूनच मुलांना फोनवर जास्त वेळ घालवण्याच्या सवयीपासून परावृत्त करा. फोनवर वेळ न घालवणाऱ्या मुलांपेक्षा फोनचा अधिक वापर करणारी मुले कमी हुशार असल्याची अनेक संशोधने दाखवतात. मूड स्विंग होणे आणि हिंसक होणे हे देखील त्याचे तोटे आहेत.



## टेक केअर

### चिकनकारी... लई भारी

उन्हाळ्यातील पेहराव ठरवताना चिकनकारी वर्क असणाऱ्या शॉर्ट कुर्तीचा अवश्य विचार करा. तुम्ही जीन्स आणि जेगिंगसोबत अशा कुर्ती घालू शकता. स्लीव्हलेस आउटफिट्स उन्हाळ्यात आरामदायक ठरतात. सिगारेट पँट, लेगिंग्स किंवा पलाझोसोबतही तुम्ही असे टॉप्स पेअर करा. उन्हाळ्यात लग्नाच्या पार्टीला जात असाल तर चिकनकारी गाऊन किंवा अनारकलीचीपर्याय निवडा. असा पेहराव केल्यास सर्वांच्या नजरा तुझ्यावर राहतील याची खात्री बाळगा.



## चटपटीत डिशेसचा धमाका

**रसगंधा**

सुट्टीच्या या काळात काहीतरी चटपटीत खाण्याचा मोह होत असतो. पण बाहेरचे पदार्थ खाऊन स्वास्थ बिघडवून घेण्यापेक्षा तुम्ही घरच्या घरी चटपटीत डिशेस बनवू शकता.



**मूग बीन्स ॲण्ड ग्रीन ॲपल दहीपुरी**

**साहित्य–** अर्धी वाटी मोड आलेले मूग, एक टोमॅटो (बारीक चिरून), एक कांदा (बारीक चिरून), दोन ग्रीन ॲपल (बारीक चिरून), अर्धी वाटी उकडलेला बटाटा, एक मोठा चमचा बारीक चिरलेली हिरवी मिरची, एक मोठा चमचा चिरलेली कोथिंबीर, दोन मोठे चमचे लिंबाचा रस, दोन टी स्पून चाट मसाला, दोन डझन पाणीपुरीच्या पुऱ्या इत्यादी.

**सजावटीसाठी–** दोन कप फेटलेलं दही, एक छोटा चमचा जीरे पावडर चवीपुरतं मीठ.

**कृती–** एका मोठ्या बाऊलमध्ये सफरचंदाचे तुकडे, टोमॅटो, कांदा, बटाटा, कोथिंबीर, लिंबाचा रस हे सर्व साहित्य चाट मसाला टाकून एकत्र करावं. दहा मिनिटं तसंच ठेवावं. त्यानंतर हा सर्व मसाला पाणीपुरीची पुरीत भरावा. सर्व्ह करताना वरून थंड दही घालावं. या दह्यामध्ये जीरं पावडर आणि मीठ घालावं.

पाणीपुरी नंतर काहीतरी वेगळं टेस्ट करण्याच्या मनस्थितीत असाल तर पुढची रेसिपी ट्राय करायला हरकत नाही.

**पनीर भुर्जी सँण्डविच–**



**साहित्य–** २०० ग्रॅम पनीर, अर्धी वाटी हिरव्या आणि पिवळ्या ढोबळी मिरचीचे काप, दोन टी स्पून आलं आणि हिरव्या मिरचीचे तुकडे, पाव वाटी बारीक चिरलेला कांदा, अर्धी वाटी बिया काढलेल्या टोमॅटोचे काप, अर्धा टी स्पून काळी मिरी, एक चमचा बारीक चिरलेली कोथिंबीर, एक टेबलस्पून रिफाईंड ऑईल, आठ ब्रेड स्लाईस, चवीपुरतं मीठ इत्यादी.

**कृती–** एका नॉनस्टिक तव्यावर तेल गरम करून कांदा परतावा. यात आलं, हिरवी मिरची, टोमॅटो आणि ढोबळी मिरची टाकून पाणी सुटेपर्यंत परतावं. आता यात पनीर कुस्करून टाकावं. चवीपुरतं मीठ टाकावं. मध्यम आचेवर परतून घ्यावं. यात मिरी आणि कोथिंबीर मिसळावी. ब्रेडला बटर लावून घ्यावं. त्यावर पनीर भुर्जीचा लेयर लावून घ्यावा. त्यानंतर सँडविच बनवून ग्रिल करावं. सॉससोबत सर्व्ह करावं. हे गरमागरम सँडविच सर्वांना आवडेल.